अनेक प्रमाणांनीं प्रतिभासमान होत असलेलें हें जगद्रूप, हें विश्वरूप माझ्या देवतेचें नव्हे तर कोणाचें आहे? हें कोणा दुसऱ्या चोराचें आहे काय? छे! तसा प्रकार मुळींच नाहीं. आपल्या अप्रबुद्ध अविचारी दृष्टीनें विश्वरूप म्हणून कांहीं वेगळेंच असतें, असली अगदीं विपरीत समजूत आम्ही करून बसतों! विचार करून प्रबुद्धबुद्धीच्या डोळ्यांनीं पाहूं लागल्यास आज विश्व म्हणून जें आपण समजत आहों तें आपल्याच आत्मभूत परमदेवतेच्या अनंत गुणांचें शक्तीचें आणि पंचतत्वात्मक भूतप्रकृतीचें अनेकविध क्रीडाकौतुक आहे, हें तिचेंच तसें सारें विश्वरूप आहे, हें पाहिजेल तेव्हां पाहिजेल त्यानें गंभीरवृत्तीनें पाहून साश्चर्यानंदभरित कां न व्हावें! हें विचित्र व अनंत विश्वरूप पाहून या उपासकास असें वाटतें कीं, आपल्या भजनीय देवतेच्या प्रकृतिरूप किंवा शक्तिरूप त्रिगुणांवांचून या सर्व त्रैलोक्याच्या रचनेंत घटक अंश दुसरे कोणीच दिसत नाहींत, तेच मूळ सत्त्व, रज, तम हे गुण सात्त्विक, राजस आणि तामस अशा अनंत आणि विचित्र कार्यरूपांनीं परिणत होऊन सर्वतोमुख परिवर्तन करीत आहेत. हे प्रकृतिरूप किंवा शक्तिरूप तीन गुण म्हणजे तीन तंतु किंवा सूत्ररेषा प्रथमतः समरूपानें म्हणजे साम्यावस्थेंत असतात, तेव्हां या तीन रेषा अशा आहेत कीं, प्रत्येकीचीं दोन टोंकें दुसऱ्या दोन रेषांच्या एकेका टोंकास लागलेलीं आहेत अशा त्या असतात. त्या स्थितींत हें गुणत्रय एक समभुज त्रिकोणच आहे. हे तीन मिळून म्हटली गेलेली प्रकृति म्हणून मूळांत एकच अव्यक्त असें सूक्ष्मरूप आहे; आणि त्रिविध किंवा अनंत विचित्र शक्ति असें जरी म्हटलें तरी शक्तित्व हें सामान्यसंमुचितरूप एकच तत्त्व आहे. यावरून एकाच अव्यक्त प्रकृतीचे अथवा एकाच सामान्यरूपशक्तीचे हे तीन गुण म्हणून तीन प्रकारचे भास आहेत. शक्ति म्हणजे असें

कांहीं एक तत्त्व, कीं, जें संकोच आणि विकास पावतें. अर्थात् कार्य-कारणभावानें व्यक्ताव्यक्त स्वरूप ती शक्ति असते. हे असे तीन गुण जर रेषारूप आहेत तर ते तिन्ही प्रथम बिन्दुमात्रस्वरूप असले पाहि-जेत; कारण, बिन्दुपासून रेषा होतात असा एक सिद्धान्त आहे. मूळ स्वयंसिद्ध, सच्चिदानंदरूप, अमूर्त, निराकार, निराभास, निरंजन अशा अधिष्ठानभूत, शुद्ध वस्तुस्थितिबर हाच कल्पित बिन्दुसंज्ञित एक मूळ उपाधि होऊन बसला. अर्थात् बिन्दूच्या उल्लेखास अधि-ष्ठानभूत कांहीं भूमिका किंवा आधारभूत एखादा फलक असलाच पाहिजे ही गोष्ट बिन्दूच्या कल्पनेबरोबर कबूल केलीच पाहिजे. त्या अधिष्ठानाच्या केवल सहज सान्निध्यरूप बलानें या बिन्दूला रेषारूपता आली; आणि रेषांपासून आकृति किंवा आकारदशा सिद्ध झाली. रे-षात्मक आकृतिवांचून किंवा अंगावांचून प्रकृतिला कांहींच थारा नाहीं. अर्थात् अंगाकृतीचे द्वारा प्रकृति रंगरूपास आली; ह्मणजे प्रकर्षेकरून कृति ती प्रकृति किंवा प्रकार, किंवा क्रियाविशेष असा अर्थ होतो. क्रियाविशेष ह्मणजे रचनाविशेष. रचनाविशेषानें आकारविशेष बन-लाच पाहिजे, ह्मणजे प्रकारवैचित्र्य उमटलें पाहिजे. सरासरी सांगा-वयाची गोष्ट अशी कीं, ब्रह्मीं मायातत्त्व कसें दिसत आहे हें कोणा-ला पाहणें असल्यास तें ◬ या अशा प्रकारचेंच आहे. ह्मणजे या आकृतींत ऐन मूळ बिन्दुरूप मध्यस्थानीं दाखवून त्याचाच व्यक्त पण समप्रमाणांत असलेल्या रेषारूपी साम्यावस्थ त्रिगुणाकार मायातत्त्वा-चा मांड दाखविला आहे. बिन्दुभाव हा त्या त्रिगुण मायातत्त्वाचा अत्यंत अव्यक्तरूपाचा द्योतक ह्मणून मुद्दाम नमूद करण्यांत आला आहे. ह्या बिन्दुसंज्ञित अव्यक्ततत्त्वास अव्याकृत ह्मणतात, नामरूपा-कारोल्लेखावांचून असलेलें असें कांहीं एक गृहीत किंवा अध्याहृतत-त्व तें हेंच होय. तथापि या अव्यक्त किंवा अव्याकृत अशा बिन्दू-

चा अंगीकार किंवा उमट होण्यास अधिष्ठानभूत जो हा मूळ सिद्ध असलेला कोरा कागद, तो आमच्या वेदशास्त्रप्रतिपाद्य अशा ब्रह्मस्थानीं आहे, असो. ह्या अधिष्ठानभूत, स्वयंभु, सन्मात्र आणि स्वयंप्रकाश अशा परब्रह्मीं अंगीकृत बिंदुसंज्ञित अव्यक्त मायेंत पुढें आठ भेद झाले. ह्मणजे तिची साम्यावस्था सुटून प्रथमतः गुणांत वैषम्य झालें. असे वैषम्ययुक्त तीन गुण आणि सूक्ष्मपंचतत्त्वें; किंवा सूक्ष्म-पंच भूतें किंवा तत्त्वें आणि मन, बुद्धि, अहंकार हे तीन असे मिळून जे आठ प्रकार, त्यांनाच अष्टधा प्रकृति असें म्हणतात. जी कांहींच नव्हती, ती ब्रह्माच्या उदासीन सान्निध्यरूप अनुग्रहानें अष्ट-पुत्रा सौभाग्यवती झाली! एवंच बिन्दूचा त्रिकोण, त्रिकोणाचा अष्ट-कोण अशा आकृति होत गेल्या. उपलक्षणेंकरून अनंत प्रकार आणि आकार होत गेले. इतका प्रकार झाल्यावर विकार किंवा विकृतभाव झाला असें ह्मणणें ओघानेंच आलें. मूळ अव्यक्त बिन्दुमात्र शक्ति, त्रिगुणव्यक्तमाया, अष्टधाप्रकृति इत्यादिक या सर्व विश्वसंस्थेंत प्रत्ये-कास गम्य आहेत. तात्पर्य, पंचभूतें, पंच शब्दादिक विषय, पंच ज्ञानेन्द्रियें, पंच कर्मेन्द्रियें, पंचप्राण, मन, बुद्धि, अहंकार आणि सत्व, रज, तम हे तीन गुण, या अशा तत्त्वातिरिक्त सर्व ब्रह्मांडांत कोणता दुसरा मसाला आहे? आणि तो कोणास उमगतां येणार नाहीं? हें सर्व साहित्य माझ्या जीवभूत ब्रह्मरूप परमदेवतेवांचून व्यर्थ आहे, तिज-वांचून हें निःस्वरूप आहे, शून्यभूत आहे. यावरून तीच परमदेवता सर्व नामरूपांनीं नटून बसलेली आहे, यांत कांहीं संशय नाहीं. ह्मणू-नच या सर्व साहित्यांत इतका चटकदारपणा आला आहे. या प्रत्ये-कांतील सारभूतस्वरूप, माझा भजनीय आणि सर्वांगमधुर, शुद्ध सच्चिदानंदघन, सर्वसामर्थ्यनिधान असा परमात्माच होऊन मला सर्व बाजूंनी दर्शन देत आहे! तो आपल्या स्वरूपाचा प्रत्यय किति सरी

स्पष्टपणें देत आहे. धन्य धन्य मी! कारण त्याच्या अनंतरूपाकार आविर्भावाचा मधुर आणि गंभीर मंगलध्वनि मला येकूं येत आहे.

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।
बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ।
रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः ।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ।
पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।

भावार्थ असा कीं, ईश्वरच सर्व भूतांचा अंतर्गत आत्मा आहे. म्हणजे प्रत्येक पदार्थास जें कांहीं तरी स्वरूप म्हणून आहे तें या परमेश्वराच्या सत्तास्फूर्तिवांचून नाहीं. म्हणून तोच उत्पन्न होणाऱ्या सर्व पदार्थांत बीजरूप आहे. बीजावांचून कोणत्याच कार्याचा विकास होणें नाहीं, तेव्हां या सर्व चराचरांत तोच बीजरूपानें प्रतिष्ठित आहे. पदार्थमात्राचें परीक्षण केल्यास त्याचें अगदीं खरें स्वरूप सत्तास्फूर्तिमात्र असतें इतकेंच कायतें शोधक बुद्धीच्या हातीं शिलक राहतें. म्हणून हाच सर्व पदार्थांतील जीव होय; हाच त्याचा आत्मा म्हणजे वास्तविक स्वरूपार्थ होय. यावांचून पदार्थ म्हणून जर कांहीं पुढें मांडला जात नाहीं, तर असा सत्तास्फूर्तिलक्षण वासुदेवसंज्ञित परमेश्वरच हें सर्व आहे. तारक अमृतही तोच आणि मारक विषही तोच, त्या परमेश्वरावांचून अमृतांत तारकशक्ति आणि विषांत मारकशक्ति कशी यावी? मात्र असा यथार्थ शास्त्रभावार्थ समजेल तो खरा महात्मा पुरुष, तो दुर्लभ आहे. सारांश, स्थूलसूक्ष्म, किंवा कार्यकारणरूप, अथवा व्यक्ताव्यक्त असें यच्चयावत् तोच सर्व; म्हणजे तोच सर्वांचें

तात्त्विक जीवभूतस्वरूप ह्मणून तोच हें सर्व. वरवर पहाणाऱ्यास तें तात्त्विकरूप मनांत येत नाहीं, ह्मणून बाह्य भासास किंमत नाहीं; खरेंच आहे, निर्जीव ठरलेल्या कलेवराची कोणास पर्वा आहे! तेव्हां अशा थोडक्या विचारदृष्टीनें आमच्या प्रस्तुत उपासकास आपल्या परम देवतेच्या प्रभुशक्तिचा सर्व तत्त्वामध्यें तद्रूपत्वानें आविर्भाव दिसत आहे.

तो ह्मणतो, कीं, ज्यांना अशा तन्मात्रा असें ह्मणतात, ते पदार्थ शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हेच होत. त्यांना विषय असें ह्मणतात. अथवा श्रोत्रादिक इंद्रियांचे प्रमेयभूत म्हणून मात्रा असें ह्मणतात, अथवा पृथिव्यादिक पंचभूतांचे ते गुण आहेत असेंही त्यांस कोणी म्हणतात, कांहीं जरी त्यास कोणीं म्हटलें तरी तन्मात्रा म्हणजे त्याच्या मात्रा; आणि मात्रा म्हणजे लेश किंवा किंचित् अंश असा अर्थ उघड दिसतो, तो तसाच घेतल्यास कांहीं वावगें होणार नाहीं. आतां 'त्याच्या' म्हणजे कोणाच्या? अर्थात् 'तत्' म्हणजे तें शास्त्रप्रसिद्ध परंतु परोक्ष असें ठरलेलें जें ब्रह्मसंज्ञित वस्तु, त्याच्याच ह्या मात्रा, म्हणजे त्याचेच हे लेश- किंवा अतिअल्प अंशभूत अर्थ असा अभिप्राय आहे. माझ्या प्रभूच्या शक्तिवशात् गुणवैषम्यामुळें परस्परांत परस्परांचें मेलन झाल्यानें या पांचांचे पंचवीस झालेले आज दिसत आहेत. ही योजना प्रभूच्या चातुर्यावांचून कोण करणार! देशकालनिमित्तक या प्रपंचास कसें नियमबद्ध केलें आहे! उत्पत्तिपासून प्रलयापर्यंत सर्व पदार्थांस कसें एक हें चक्राकार परिवर्तन लावून दिलें आहे! स्थावर आणि जंगम यांना कसे परस्पराशीं उपकार्योपकारकभावांत त्यानें गोंवून टाकिलें आहे! सर्वांत सर्वरूप कसा तो नटून बसला आहे! माझ्या प्रभुशक्तीचा कसा विलक्षण विलास हा पहा, केवढें त्याच्या प्रकृतीचें वैचित्र्य! पृथ्वींतील गंध हें तत्त्व मी आहें असें भगवान् ह्मणतात तें खरें; कारण गंध नाहीं तर पुष्प हें काय आहे, तें निर्माल्य, निःस्वरूप,

निर्जीव ह्मणून फेंकून देण्यासच योग्य; ह्मणजे तितक्यापुरता गंध हा पृथ्वीचा आत्मा, पुष्पाकार ती पृथ्वी तर त्याचें बाह्य केवळ शरीर होय. सुगंध हुंगतांना मला किति सुख होतें, त्या अर्थीं त्यांत कांहीं तरी प्रभूचा प्रसाद आला आहे; सुवास ही प्रभूच्या प्रसादाची, त्याच्या आविर्भावाची एक खूण आहे; त्याचें योग्य गौरव व्हावें ह्मणून त्यानें घ्राणेंन्द्रिय केलें. ह्मणजे माझा भगवानच आपण गंध होतो आणि घ्राणेन्द्रिय होतो. पुनः भगवान् ह्मणतात कीं, उदकांतील रस मी आहें, खरी गोष्ट आहे; रस ह्मणजे आनंदच, आणि तो माझ्या प्रभूच्या खुद्द स्वरूपावांचून कोठेंही नाहीं; ह्मणून उदकांतील रसाच्यापुर्तें पहाणें असल्यासही, तो षड्विधरस आपापल्या स्थानीं कसा रुचिकर असतो! तो किति प्रेम उत्पन्न करतो, आपल्यास किति सुखकर असतो, त्याचा मान करण्यास प्रभूनें रसनेंद्रियासारखें योग्य साधन केलें. रस जर तो भगवानच आहे तर रसना तरी दुसरें कोण होणार? रस नाहीं तर उदक तुच्छ; उदकाचा आत्मा रस. यावरून तो प्रभुच सर्वांचा आत्मा, प्रभुशक्तीचा सर्वांस धीर, असेंच ह्मटलें पाहिजे. पुनश्च भगवान् असें ह्मणतात कीं, आकाशांतील शब्द मी आहें, अगदीं बरोबर, नाहीं ह्मणावयास कोण समर्थ आहे? शब्दावांचून आकाश काय आहे! आकाशाच्या तंबूंतील मध्यस्तंभच हा शब्द आहे; शब्दरूप आत्म्यावर आकाश ह्मणजे एक खोळ आहे. धन्य शब्द! याचा उपयोग किति ह्मणून सांगावा! ज्ञानोबारायासारखे ह्मणतात कीं, हा 'अमूर्ताचा विशद आरसा'; परब्रह्मासारखी गाळीव अमूर्त वस्तुही बिंबवून देण्यास हाच शब्दरूप एक निर्मळ आरसा आहे; शब्दावांचून आजपर्यंत कोणालाही परब्रह्मानुभव घेतांच आला नाहीं, आणि पुढेंही तो घेतां येणार नाहीं. स्वतःसिद्ध, स्वयंप्रकट, सच्चिदानंदरूप परब्रह्मात्मवस्तूच्याही अनुभवासाठीं शब्दाचे द्वारीं या मुमुक्षूनें

गेलें पाहिजे, मग इतर स्थूलसूक्ष्म वस्तुविषयीं बोलावयासच नको. तेव्हां असा जर शब्दाचा उपयुक्तपणा आहे, असा जर त्यांत प्रभाव आहे, तर त्या दृष्टीनें यांत माझ्या उपास्य देवतेचीच सूक्ष्म चमक आहे असें ह्मटलें पाहिजे. शब्द हें माझ्या भगवंताचें रूप आहे असें ह्मणणें प्रसंगीं योग्यच आहे. माझा प्रभुच जर शब्द आहे तर त्याचें ग्राहक जें श्रोत्रेंद्रिय त्यांत तरी दुसरें कोण असूं शकेल! त्याचप्रमाणें शब्दाचा उल्लेख ज्या योगानें होतो त्या ह्या वागिन्द्रियांत माझी उपास्यमूर्ति आविर्भूत नसेल तर शब्दाचा उल्लेख कसा होणार? सारांश, भगवानच जर आकाशांतील शब्द, तर तें श्रोत्रेन्द्रिय आणि तें वागिन्द्रियही तोच आहे यांत संशय नाहीं. तेथें माझें कर्तृत्व मला तरी निदान कबूल नाहीं; दुसरें कोणी कांहीं ह्मणो. मी बोलतों आणि मी ऐकतों यांत मजकडील कर्तृत्वांत त्याचाच शक्तिसमावेश आहे. मला ती प्रतिनिधि करते या अभिप्रायाचे ते उद्गार आहेत,इतकेंच काय तें. सूर्य आणि चंद्र यांच्यामध्यें प्रभा आहे; ती आज आपल्या चर्मचक्षूलाही गोचर होत आहे. अग्नींत प्रखर तेज आहे, तेंही आपल्यास नेहेमीं प्रत्यक्ष अनुभवास येत आहे, याबद्दल कोणासही शंका नाहीं. पण ते सूर्य, चंद्र आणि अग्नि कधींपासून या जगाला मिळाले आहेत, आणि पुढें किती कालपर्यंत ते असणार हें कोणास कळत आहे! त्यांच्या प्रभेच्या आणि तेजाच्या उपयुक्तपणाबद्दल कोणासही शंका नाहीं. त्यांचा उपयुक्तपणा संपूर्णपणें ज्यास सांगतां येईल असा येथें एकही प्राणी मला तरी दिसत नाहीं; तेव्हां ती प्रभा आणि तें तेज हें काय तत्त्व आहे याचा विचार करूं लागल्यास माझी मति थक होऊन जाते. जगद्गुरु भगवान् श्रीकृष्ण म्हणतात कीं, 'ती प्रभा आणि तें तेज मीच आहे. पदार्थांतील रूप, रंग, आणि त्यांच्या प्रत्यक्षतेचें साधनीभूत जें चक्षुरिंद्रिय, हें रहस्यकौशल, हें अतिसूक्ष्म तत्व काय आहे?

इतकें खरें कीं, तें एक पारमेश्वरीतत्व आहे, तेव्हां तो माझ्या प्रभूचा एक नित्य आविर्भाव आहे, असेंच कबूल केलें पाहिजे. त्यापुढें नम्र असलें पाहिजे, पारमेश्वरी शक्तिचा हा केवढा मोठा टळटळीत चमत्कार आहे! पण तो नित्यासारखा मिळाला आहे, तेव्हां त्याविषयीं आतां विशेष आदर नाहीं, मग आश्चर्य तरी काय वाटणार! त्याबद्दल कौतुक वाटेनासें झालें. पण ईश्वरी दरबारांत हा प्रमाद अक्षम्य ठरेल. आम्हांस हितकर, पवित्र असें अन्न आणि उदक मिळावें, जें खाल्लें व प्यालें, त्याचें चांगलें पचन व्हावें, आणि पुनः क्षुधेचें प्रदीपन व्हावें, याबद्दल कोणत्या देहाभिमान्याची प्रार्थना नाहीं! ती पचनक्रिया ज्यापासून, तो जठरस्थ वैश्वानर मी आहें, तो जठराग्नि नारायणच आहे; भोजन हें त्याबद्दल नित्य हवन आहे असें कां वाटूं नये? चलन आणि स्पर्श हें ज्याचें स्वरूप, तो पवन भगवानच आहे. ही जिन्नस भगवंतानें या जगास दिली नसती तर मग सर्व हालचाल बंद! सर्व जागच्याजागीं राहणार. कोणास काय करतां आलें असतें किंवा येईल! या उच्च नभोमंडलांत जे तेजोमय असंख्य तारापुंज, नक्षत्रमाला आणि ग्रहगण चमकतात, त्यांचीं नियत परिभ्रमणें पाहून कोणाची अक्कल गुंग होणार नाहीं! नद, नद्या, सरोवरें आणि समुद्र; लता, वृक्ष, पर्वत, आणि तृण, धान्यें; अनेक प्रकारचे देह आणि अनंत प्राणी; उदय अस्त, उत्पत्ति प्रलय इत्यादिक हे अनंतप्रकारचे अनंत चमत्कार पाहून मला तर असें वाटतें कीं, तो गुप्त व अमूर्त परमात्माच सर्वतोमुख पुढें उभा आहे तेव्हां हात जोडून गलित अभिमान होऊन ‘उगीच त्याच्या चरणीं लवावें’ हेंच निरंतर मनांत येतें; कांहीं बोलूं नये हीच त्याचीं स्तुति असेंच मला वाटतें, कारण बोलावें तितकें फिकेंच लागतें, म्हणून तसें म्हटलें. एरवीं बोललें म्हणून काय झालें, त्याचीच वाचा आहे; त्याली गोड करून घेणेंच

आहे, तो कौतुकच करील. तोच आई आणि बाप, तोच गुरु आणि सुहृद; तोच माझें सर्व, माझें कांहीं नाहीं व मी कांहीं नाहीं. त्याचेंच सर्व आणि तोच सर्व!!! वृक्षाचीं फुलें, पत्री, मंजुळा हातानें तोडण्याचा सोस मला नाहीं, तीं आहेत तिथेंच काय वावगीं आहेत? आतां मला अशीच पूजा करावीसें वाटतें. सत्कर्मेंकरून श्रम व्हावेत, आणि अंगास घर्म यावा हें मला पवित्र गंगेचेंच तीर्थस्नान वाटतें. वेदमय वाणीनें त्याचें स्तवन करावें, शिवशिव, हरिहरि, रामराम हरशंकर कृष्णकृष्ण, नारायण, वासुदेव, असा नामघोष तर करावाच, पण अंतरसाक्षीनें सत्य बोलावें, ते उद्गार त्याचेंच नामसंकीर्तन आहे; याशिवाय निजला तरी जप चालावा, जप न करतांच एक जप होतो असा सहज सोहंध्वनीचा जप अहोरात्र मलाच एकाला घडत आहे असें नाहीं. सर्व प्राणवंत जीवांचे ठिकाणीं तो चालला आहे, तोही मला ऐकूं येत आहे. प्रत्येक वाङ्मयांत प्रणवाचें मुद्दलतत्त्व सिद्ध आहे, हें माझ्या लक्षांतून कां चुकावें! त्याचें मला नित्य स्मरण असो. पातकी किंवा दुर्जन असा वास्तविक कोणीच नाहीं, मग त्या तशा कल्पनेनें मला त्याविषयीं विनाकरण तिरस्कार काय म्हणून वाटावा. कारण पाप, भय आणि दुःख, हें सर्व त्या निर्भय परम मंगलरूप आणि शुद्ध पुण्यात्मक अशा सुखमय आनंदाच्या माधुर्यांत अखंड स्वादिष्टता आणि नित्य निरवधि आदरणीयता वाटावी म्हणून तितक्या पुरतें एक त्या अभिलषणीय आनंदाचेंच स्थित्यंतर आहे; आणि या दृष्टीनें पहातां माझा भगवानच हें सर्व आहे; अर्थात् ज्यास परमेश्वर असें म्हणतां येत नाहीं तें पाप आणि दुःख, एकंदरींत वाईट म्हणून येथें कांहीच नाहीं, सर्वच चांगलें आणि म्हणून सर्वच तो, तेव्हां सर्व मंगलमयच आहे. अशा उदात्त कल्पना सुचणारें हें मन तरी माझें आहे असें मी कसें म्हणावें? हें मनही तोच. असे गंभीर आणि

निर्मळ विचार करणाऱ्या या बुद्धींत त्याचाच सानुकंप प्रकाश दिसत आहे असें म्हटलें पाहिजे, माझ्या मीपणांतील सर्व धीर आणि आकार तोच आहे. हें सर्व त्याचें त्याच्या ठिकाणींच आहे, तेव्हां त्यास अर्पण असो हे उद्गार अतिरिक्तच दिसतात. किंबहुना मलाच अगोदर स्वतंत्र मीपणानें आतां उरतां येत नाहीं; मी हरवलों, मी वितळून चाललों, मी आटून जात आहें. वाहवा! मीच संपलों. आतां जो उरत आहे, त्याची सिद्धि त्याच्या कडूनच आहे, ती माझ्या आधीन नाहीं, कारण मीच संपला. भगवंता तूंच कायतो उरणारा येथें आतां सर्व दिसत आहेस. आतां तूंच सकल, केवल, समरस, आणि स्वसंवेद्य.

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम्
वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनंतरूप ॥
अनंत देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्परं यत् ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोपि नमो नमस्ते ॥
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोसि सर्वः ॥

हे देदीप्यमान प्रकाशरूप परमेश्वर, तूं सर्वांचा उत्पादक, तूं सर्व जगाच्या लयाचा अधिष्ठान, तूं सर्वसाक्षीभूत; आणि साक्ष्यरूप किंवा दृश्यभासरूपही तूंच आहेस. कारण, तुझ्या सत्तास्फूर्तिरूप प्रकाशानें त्यास व्यापल्यावांचून तें स्फुरत नाहीं, तेव्हां तूंच या सर्व वेद्यरूपांनीं पसरला आहेस. आहे आणि नाहीं या उभयविध उपाधिरूप कल्पनेंत तूंच भरला आहेस. वस्तुतः तूंच एकरस एकस्वभाव आणि अक्षरसंज्ञित आहेस. तुझ्या रूपास अंतपार नाहीं. सर्व देव, देवता, गन्धर्व, पितर, यक्ष, राक्षस, भूत, पिशाच तूंच आहेस. सर्व खाणी वाणी, जीवजंतु पदार्थमात्र तूंच आहेस. त्या सर्वरूप अशा तुला माझा नमस्कार असो, सहस्रवेळां नमस्कार असो, देवा! पुनरपि आणखीही

तुला नमस्कार असोत. तुजला तुझ्या पुढच्या बाजूस नमस्कार असो, तुझ्या मागच्या बाजूस नमस्कार असो, तुझ्या ऊर्ध्व भागास आणि अधोभागास नमस्कार असो, तुझ्या सर्व बाजूस माझ्या सर्वांगांनीं नमस्कार असो. तूं अनंत सामर्थ्यवान् आणि अनंत पराक्रमशाली आहेस; तूं एका आपल्या सत्तास्फूर्तिबलानें सर्व कांहीं सुरेख रीतीनें व्यापलें आहेस, ह्मणून तूंच सर्व आहेस; मग तेथें विराट, हिरण्यगर्भ, आणि ईश्वर, आणि निरनिराळ्या त्या अनंत विभूति इत्यादि हा भेदभाव, किंवा उच्चनीचभाव आतां मला दिसतच नाहीं. ह्मणून सरसकट एकसारखे नमस्कारच करीत राहावें, असेंच आतां मला वाटतें. तथापि असला नमनकर्तृरूप अहंकारही त्वन्मय सर्व स्वरूपांत वेगळेपणानें जर स्फुरत नाहीं तर मग नमस्कार हा पदार्थ एकवारच, क्षणभर उगीच बोलण्यापुरता आहे. नाहीं तर अनंत नमस्कारांनींही तूं प्रसन्न होणार नाहींस; तस्मात् पुनः एकवार शेवटीं निरहंकार आणि नम्यनमकद्वैतभाववर्जित असा कायमचा एक नमस्कार अनन्य तुला असो. अशा प्रकारचा हा परमेश्वराच्या विश्वरूपाचा उपासक आहे. याच रीतीच्या चिंतनानें त्यास आनंदाच्या लहरीवर लहरी येऊन त्यांत तो अनन्य मिळून जात आहे. धन्य हा उपासक! भव्य याची धारणा! या मार्गानेंच त्यास तत्त्वज्ञानपूर्वक मोक्षलक्षण परमगति साध्य आहे.

आतां आमच्या जवळ आणखी एक प्रकारचा उपासक आहे तो ईश्वर ह्मणून एक विशिष्ट मूर्तिरूप सर्वांगसुंदर अशा देवतेची उपासना करूं इच्छितो. यास आह्मी मूर्त्युपासक असें ह्मणतों. यांतील थोडासा विचार करूं या. यद्यपि सगुण साकार उपासनेच्या प्रकारांत विश्वरूपाची उपासना सर्वथा श्रेष्ठ व मान्य आहे तरी पण, येथें जीवाचा स्वभाव असा कांहीं चमत्कारिक आहे; कीं, पूर्वोक्त विश्वरूपाची उपासना त्यास झेंपत नाहीं; त्यास असें वाटतें कीं, जशी माता ह्मणजे एक विशिष्ट कोणी

व्यक्ति आपल्यास अपेक्षित असते; किंवा पिता, सखा, बंधु, स्वामी गुरु, पुत्र, वल्लभ इत्यादिक हेही जसे एक व्यक्तिविशेष आपल्यास सर्वदा अपेक्षित असतात, ते प्रत्यक्ष आपल्या सर्व समाधानाची एक जागा ह्मणून जसे आपल्यास मान्य असतात, त्याप्रमाणें ईश्वर ह्मणूनही कोणी एक व्यक्तिविशेष आपल्यापुढें प्रत्यक्ष असावा, असें त्यास वाटत असतें. जशास तसें असावें असें वाटणें हें अगदीं स्वाभाविकच आहे; आपण जसे देहलोभानें मूर्तिरूप आहों तसा आपल्यास आपला ईश्वरही मूर्तिरूप असावा असें वाटणें हें ओघानें स्वाभाविकच आहे. आपल्यास आपला तारक ईश्वर प्रत्यक्ष मूर्तिमंत असावा, तो सर्व योग्य सद्गुणांनीं मंडित तर असावाच, पण तो आपल्यासारखा मूर्तिरूप साकार, असावा; बरें असें वाटत नाहीं, असा जगांत एकही साधारण मनुष्यं नसेल. ईश्वर हा अगोचर, निराकार, अमूर्त, निर्गुण, निरवयव आहे ही समजूत शेवटीं विचारशील बुद्धीच्या अधिकारी जीवासच कबूल आहे हें सर्व खरें. तथापि प्रत्येक साधकाची प्रथम बाल अवस्थाच अशी कांहीं आहे कीं, तिजमध्यें त्यास देव ह्मणजे पुरुषविशेष अशीच कल्पना आहे. आपली शारीरिक बालदशाच पहावी, त्या स्थितींत आपल्यास असें वाटतें कीं, आपल्यास अवलंबून असण्यास कोणी तरी एखादी व्यक्ति, मग ती कोणी असो, अवश्यमेव अपेक्षित असते. आईबाप, कोणी वडिल भाऊ, वगैरे किंवा बहीण, मावशी किंवा मामी, आजी आजा, निदान अनाथाचा कनवाळु ह्मणून तरी कोणी पालक असा मानलेला व्यक्तिविशेष असा असतोच, आणि तो आपल्यास असावा असें वाटतच असतें; त्याच्या लाभांत आपल्यास किती धीर वाटत असतो, किति समाधानी वाटते, आपण कसे अगदीं निर्भर असतों, अशा व्यक्तीचा आपल्यास वियोग झाल्यास आपल्यास कसें वेड्यासारखें होऊन जातें! सर्व

शून्य वाटतें! सर्व भणभणीत दिसतें. सारांश, कोणावर तरी आपण अवलंबून असणें अशीच आपली बालदशा असते, आपलीचशी काय, पण जगांत सर्व जीवांची स्थिति अशीच असते, आपला परंपरेनें असाच संस्कार हृदयांत उमटलेला आहे, आणि तोच संस्कार परमार्थाच्या अवस्थेंतही तसाच अनुगत असतो. आपल्यामध्यें घरोंघर असणारे देव्हारे आणि गांवोंगांव असणारीं देवळें हीं याच गोष्टीचीं साक्षिभूत आहेत; म्हणजे त्यांतून असलेल्या प्रतिमा, किंवा मूर्ति, याच प्रथमतः आपल्याला ईश्वर अशी कल्पना झालेली असते; फार झालें तर तशा लक्षणाची ईश्वरीय मूर्ति अदृश्य अशी त्या दिव्यरूप वैकुंठ-कैलासादिक लोकांत आहे, तेथून ती आपल्यावर सत्ता ठेवून नियमन करीत असते तिच्या नामरूपाच्या उपासनेनें तिचा साक्षात्कार होतो, तिचे अवतार या भूलोकांत होतात, त्यांचे साक्षात्कार अनेक उपासकांस झाले आहेत, होतात, आणि होतील. सांगावयाची गोष्ट अशी कीं, ईश्वर, त्याचे अवतार, त्याच्या विभूति दृग्गोचर होतात, याविषयीं अनेक साक्षिदार आहेत, अशी उपासनापरंपराही आहे; यावरून ईश्वर ह्मणजे कांहीं एक अद्भुत आणि अनेक महागुणांनीं संपन्न असा व्यक्तिविशेष असतो अशी ठाम कल्पना आहे, ती सर्व शिष्टसंमत आहे, ईश्वर ह्मणजे पुरुष विशेष असें कित्येक शास्त्रकारही कबूल करतात; पतंजलिमुनीच्या योगशास्त्रांत असें एक सूत्र आहे कीं,

क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ।

ह्मणजे अविद्या, अहंभाव, प्रेम, द्वेष, अभिनिवेश असे पंचक्लेश, कर्म, सुखदुःखात्मकफलभोग, आणि वासनात्मकसंस्कार, यांचा ज्याला स्पर्श नाहीं असा जो पुरुषविशेष, त्यास ईश्वर असें ह्मणावें; यांत आकाराचा किंवा मूर्तरूपाचा जरी स्पष्ट उल्लेख नाहीं, तरी तसाहि तो अभिप्रेत असावा असें ह्मटलें पाहिजे; नाहीं तर हे आतां सांगितलेले

असद्गुणधर्म ज्याच्या ठिकाणीं नाहींत असा तो आहे हें म्हणण्यांत कांहींच जीव नाहीं, ह्मणजे निराकारी अमूर्तस्वरूपांत ते असद्गुणधर्म नाहींत असें सांगण्याचें कांहीं प्रयोजनच नाहीं, तेथें यांची कल्पना कोणालाच नाहीं; यावरून ईश्वर ह्मणजे मूर्तिमंत, जीवंत असाच कोणीएक व्यक्तिविशेष; पण तो अनेक लोकोत्तर कल्याणगुणमंडित असंतो हाच त्याचा विशिष्टपणा; असो वेदशास्त्रपुराणादिकांनीं त्याच्या सावयव सालंकार, सायुध, सुशोभित, सपराक्रम सद्गुणमय अशा स्वरूपाचें वर्णन करून आणि तसें ऋषिमुनीनीं प्रत्यक्ष पाहून जगास सन्मार्ग लाविला आहे; तेव्हां आपल्या अस्थिमांसमय, रक्तरेतघटित, विष्ठामूत्रप्रपूरित, अविद्याकामकर्मादिबीजसंभूत असल्या अतिशय अमंगल दुर्गंध शरीरावर प्रेम करण्यापेक्षां, दिव्यलावण्यघटित रमणीय सकलांगसंपन्न, सर्वैश्वर्यपरिपूर्ण आनंदामृतरसरचित अशा भावनागम्य पारमेश्वरी मूर्तीची पूर्णप्रेमभरानें उपासना करणें सहस्रपटीनें गुणकारकच आहे. मुखेंकरून तिची नवविध भक्ति करावी; ही पारमेश्वरी मूर्ति ह्मणजे सर्वतोमुखविस्तृत अशा विश्वरूपात्मक भगवन्मूर्तींतील सारसमुच्चयाचें एकीकरण जिच्यांत झालेलें आहे अशीच समजावयाची. ह्मणजे बीज हें दिसण्यांत अगदीं लहान असतें, पण त्यावरच गगनचुंबित विस्तीर्ण वृक्ष उभारला जातो,त्याप्रमाणें श्रीकृष्ण भगवंताची मूर्ति दिसण्यांत लहानशी दिसत होती; पण त्या प्रसंगापुरती तिजवरच विश्वरूपाची मांडणी महाभाग्यवंत अर्जुनास दिसून आली; सारांश, मूर्ति लहान असली तरी तिच्यांतील समुच्चित गुणोत्कर्ष जगभर पसरतो; कसेंही असो, कांहीं एक पारमेश्वरी मूर्ति आपल्या आवडीप्रमाणें हृदयांत आणि दृष्टिपुढें अभ्यासानें रेखीव अशी नित्य सिद्ध साधून मांडलेली असावी; ती आपला जीवप्राण आणि आत्मा अशा शुद्धभावसर्वस्वबलानें तिचा छंद लागावा; तोही सर्वथा स्पृहणीय आहे.

ज्यास तो छंद लागतो, तो क्रमानें सद्गतिलाच पावतो आणि धन्य होतो; या उपासनामूर्तींत मूळ मुद्दल सच्चिदानंदरूप अमूर्ततत्त्व असलें पाहिजे हें तर अगोदर या उपासकासही इष्ट आहेच; अर्थात् तशा आनंदाकरितां तर तो तिची उपासना करतो, हाच त्याच्या हृदयांतील एक अद्वितीय मुख्य अभिप्राय आहे; अशा प्रकारच्या मूर्त्युपासनेंत मुख्य दोन अंश आहेत, एक नाम आणि दुसरें रूप; नाम ह्मणजे वाचक, बोधक, स्फोरक, द्योतक, किंवा स्मारक असें आकाशगुणात्मक शब्दतत्त्व; आणि रूप ह्मणजे त्या शब्दाचेद्वारा बुद्धीन्द्रियास गम्य होणारें भासरूप किंवा प्रकाशमय असें अर्थतत्त्व. विचारान्तीं शब्द आणि अर्थ हे परपपरांशीं अनन्य संबद्ध असल्या-मुळें त्यांत द्वैतभाव आहे असें म्हणतां येत नाहीं. तेव्हां ते एकात्मक एकरूप असेच आहेत; सरासरी शब्दार्थस्वरूप ह्मणजे तें एक सबंद आकाशतत्त्व असेंच रहस्य आहे, ह्मणजे शब्द आणि अर्थ हीं त्या आकाशाचींच दोन अंगें आहेत; पण बहिरंग कोण आणि अंतरंग कोण हा कीस काढण्यांत फारसें हंशील नाहीं; कारण शब्दटणत्का-रावांचून अर्थ स्फुरण नाहीं, आणि अर्थावांचून शब्दांत कांहींच धीर नाहीं, ह्मणून कोणकोणाच्या आंत आणि बाहेर हाही विचार नि-दानीं टिकत नाहीं. आकाश म्हणजे अवकाश, तो मिळाला किंवा झाला तर या शब्दार्थरूप द्विविध भासास कांहीं आकार; नाहींतर ते शू-न्याकार, ह्मणजे आकाशतत्त्वाच्या उत्पत्तिरूप अंगीकारानें या उभ-यतांस स्वरूपलाभ आहे; या शब्दार्थस्वरूप, जन्य आणि वेद्य अशा स्फुरणावरून अवकाशरूप आकाशाची कल्पना; अर्थात् तें आकाश-तत्व कल्पनाकृत आहे असें ठरलें आहे; कल्पना आपल्या अंतरंगांत प्रत्यक्ष ज्ञात असते, त्यावरून अंतर्यामांत स्वयंसिद्ध ज्ञानमात्रस्वभाव अशी सर्वावभासक चैतन्यकला आहे हें सिद्धच झालें; कल्पना म्हणजे

चित्त. आणि चित्त ह्मणजे चैतन्यास अपरपर्याय जें चित् त्यांतलि त-कारास द्वित्तरूप; म्हणजे यांत असें निष्पन्न झालें कीं, द्रवरूप असलेलें उदक गोठून जशी त्याची टणक गार होते, त्याचप्रमाणें समरस आणि स्वयंसिद्धरूप असलेलें चैतन्यच एकांशानें आपलें आपल्यावर आदळून टणक किंवा किंचित् घट्टसें बनतें, तेंच हें चित्त; द्वित्त म्हणजे कांहींएक मूळ आयतें सिद्ध असावें व स्फुरावें, मग तत्संबद्ध अंमं तत्सदृश दुसरें कांहीं यावें, किंवा भासावें असें जें त्यास द्वित्त म्हणावें; त्याप्रमाणें येथें मूळ अमूर्त स्वयंस्फुरद्रूप असलेलें जें अवभासक चित्, त्याच्याशीं अनन्यपणें संबद्ध असा जो त्याचा अनुकारी व त्याचा प्रतिभास किंवा तसदृश त्याचाच द्वितीय भास याचें नांव एकंदर चित्त; बाह्य आधिभौतिक दृष्टीनें ज्यास आपण भूताकाश असें म्हणतों, त्यासच अध्यात्मदृष्टीनें अंतरंगांत हृदयाकाश किंवा चित्ताकाश असें ह्मणावें. वाणीनें उच्चार्यमाण आणि श्रोत्रानें श्रूयमाण अशा शब्दार्थभासानें जशी भूताकाशाची आपल्यास ओळख होते, त्याप्रमाणें अंतर्यामांत कल्पनात्मक शब्दार्थभासानें हृदयाकाशाची ओळख आपण धरावी; सरासरी मध्यें शरीराची भिंत उभी करून बाहेर भूताकाश आणि अंतरांत हृदयाकाश; आंतमध्यें म्हणून सूक्ष्म, आणि बाहेर म्हणून स्थूल. तथापि या स्थूलसूक्ष्मरूप आकाशतत्त्वांतील सार शब्दार्थभासच केवळ आहे. जसे समुद्रीं एकसारखे भासणाऱ्या तरंगपरंपरेंत एकच समरस उदकमात्रस्वरूप असें अधिष्ठान असतें, त्याप्रमाणें या स्थूलसूक्ष्मरूप शब्दार्थभासपरंपरेंत चित्संज्ञित एकच अधिष्ठानभूत स्वयंसत्तात्मक स्वरूपतत्त्व आहे; म्हणजे त्या स्वयंभासरूप चिद्रूप अधिष्ठानावर ही शब्दार्थसंज्ञित एकच पण द्विधाभासरूपाची विचित्र परंपरा विविध आणि विशेष रूपानें वर्तत आहे; सांगावयाचें तात्पर्य असें कीं, हें

संपूर्ण आणि अतिविचित्र कार्यकारणरूप विश्व जर आपण सूक्ष्म चाळून पाहिलें तर त्यांत नाम आणि रूप इतकाच काय तो घटक अंश आहे.

आतां कोणी कचित् असें ह्मणेल कीं, सत्त्व, रज आणि तम अशा तीन गुणांपलीकडे या विश्वरचनेंत दुसरा कोणताच मसाला नाहीं; किंवा कोणी ह्मणेल कीं, तिच्यांत पंचभूतांहून अधिक कांहीं नाहीं, अशा कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी हें सर्व जगत् नामरूपात्मकच आहे ही विचारसरणीची दृष्टि एका रीतीनें विशेष मार्मिक आणि महत्त्वाची आहे, ह्मणून प्रस्तुतप्रसंगीं या सर्व जगतांत नाम आणि रूप इतकेंच सारभूत घटकतत्व आहे अशा विचारसरणीचा आह्मांस विशेष आदर वाटतो याचें कारण ओघानें लक्षांत येईल, असो; आतां नाम आणि रूप ह्मणजे शब्द आणि अर्थ. पुनः शब्द आणि अर्थ ह्मणजे तरी काय? तर आंतरबाह्य असें आकाशतत्व असा अर्थ आह्मीं सांगून ठेवला आहेच; त्यांतही त्याच्या आंतरभागास चित्ताकाश किंवा हृदयाकाश म्हणावें हेंही आह्मीं समजवून दिलें आहे; तसेंच त्या ह्या हृदयाकाशाचाही आंतरगर्भ कोण काय आहे हेंही आम्ही सप्रत्यय मनांत भरवून दिलें आहे; ह्मणजे चित् किंवा चैतन्य हेंच तें हृदयाकाशांतील गर्भभूत किंवा अधिष्ठानभूत परमसूक्ष्मतत्व आहे असें ध्यानांत आलें असेलच; आतां चैतन्य ह्मणजे जीव किंवा आत्मा; ह्मणजे आपलेंच वास्तविक स्वरूप असा अर्थ आहे. त्याचप्रमाणें ईश्वर ह्मणजे तरी चैतन्यलक्षणच आहे, यावरून उपास्योपासकांचें ऐन मुख्य तात्त्विकस्वरूप म्हटलें ह्मणजे चैतन्यमात्रच आहे; परंतु अशा केवळ चिन्मात्र स्वरूपस्थितींत नामरूपाची दाद नाहीं, ह्मणजे ती अनाम आणि अरूप, निराभास आणि निराकार, निरवयव आणि अमूर्त अशी आहे, हें ध्यानांत आलेंच पाहिजे, आम्हीं चैतन्य हा शब्द उच्चारल्याबरोबर असें लक्षांत आलें पाहिजे कीं,

तें आपला आणि सर्व चराचराचा आत्माच होय; आणि हा आत्मा म्हटला म्हणजे तो निरतिशय प्रियरूप म्हणून निरवधि आनंदरूप असाही अर्थ ध्यानांत आला पाहिजे. इतकेंच नाहीं, पण तो अनाद्यनंत असा आहे; त्याच्या सत्तेनें सर्वांस अस्तित्व आहे म्हणून तो स्वयंसत्तारूप आहे हेंही सिद्ध आहे. तो शुद्धचैतन्य आहे असें म्हटल्यानें तो स्वयंप्रकाशरूप किंवा स्वयंभानरूप किंवा केवल सिद्धज्ञानरूप असाच आहे; आणि म्हणून तोच सर्वांस प्रकाशक, भासक आणि ज्ञापक म्हणून साक्षिभूत असाच तो आहे हेंही कबूल आहे. कोणी म्हणेल कीं, मूर्त्युपासनेंत हा तत्त्वज्ञानविचार कशासाठीं पुनः उपस्थित झाला ? त्यास इतकेंच आमचें सांगणें आहे कीं, उपास्यमूर्तींत तरी हेंच सर्वसाक्षिभूत सर्वप्रकाशक असें सच्चिदानंदसंज्ञित अमूर्त आणि अविनाशी निर्विकार तत्त्व आहे, आणि या उपास्यउपासकाचेंही तसेंच तात्त्विकस्वरूप आहे, म्हणून तें सहजच अभिन्नरूप आहे. अर्थात् अशा दृष्टीनें तें त्यास नित्य प्राप्तच आहे; परंतु स्थूलसूक्ष्म अशा देहादिविषयापर्यंत यांस अज्ञानरूप मायामोहयोगानें अहंताममताभ्रांतीनें देहाद्याकारता मिळाली आहे. म्हणजे हा नामरूपात्मक बनल्यासारखा झाला आहे; बरें याला पाहिजे आहे तर ती अमूर्त नामरूपहीन अशी केवल नित्यसच्चिदानंदस्वरूपस्थिति. पण तेथें हा यावा कसा! इकडे आपला नामरूपाकर देहाद्यात्मभाव तर याचा सुटत नाहीं. तेव्हां ईश्वर म्हणून कांहीं सुंदर, वेधक आणि तारक अशी नामरूपात्मक दिव्यदेहधारी मूर्ति याच्या पुढें त्याच्या त्या सच्चिदानंदरूप आत्म्याच्या कृपेनेंच योगसामर्थ्यवशात् प्रकट होत असते; अभिप्राय हा कीं, अशा नामरूपात्मक दिव्यमूर्तिरूपाच्या उपासनेनें त्या आपल्या अभिन्न आणि नामरूपहीन अमूर्तस्वरूपीं हा एकदाचा मिळून जावा. रहस्य असें कीं, अधिष्ठानभूत

नामरूपरहित आणि अमूर्त चैतन्य ह्मणजे सर्व विश्वाचा प्रकाशक असा प्रकाश, हा अर्थ तर ठरलाच आहे आणि नामरूपात्मक विश्व ह्मणजे हृदयाकाश किंवा चित्ताकाश आणि भूताकाश असाही अर्थ ठरला आहेच. पण आकाश या शब्दाचा धात्वर्थच एकदा आपण मनांत घेऊं या, 'आ' हा उपसर्ग आणि 'काश' आ धातु असे येथें अवयव आहेत; काश म्हणजे प्रकाशणें असा अर्थ आहे, 'आ' याचा अर्थ आसमंतात् किंवा किंचिन्मात्ररूप म्हणजे अगदीं सूक्ष्मरूप असा ठरला आहे. आतां चैतन्यरूप जो स्वयंसिद्ध सहज प्रकाश, तो आणि आकाशसंज्ञित जो एकंदर प्रकाश तो, असे हे प्रकाश खरोखर दोन आहेत किंवा कसें हें पाहूं गेल्यास 'चैन्यप्रकाश आणि आकाशसंज्ञित प्रकाश' याचें भाषांतर असें होतें कीं, तो अमूर्त आणि नामरूपहीन असा चैतन्यप्रकाशच हा आकाश म्हणजे आसमंतात् अतिसूक्ष्मतेनें किंचित् नामरूपाकारविशेषप्रकारानीं प्रकाशमान किंवा विकासमान अथवा भासमान होत आहे; अथवा यांत असा प्रकार पाहिजेल तर मानावा कीं, चैतन्यप्रकाशाच्या कक्षेंतच जर सर्व नामरूपात्मक विश्वाकाश भासत आहे तर त्या मूळ चैतन्यप्रकाशासही एकप्रकारचें अवकाशात्मक आकाश असेंच म्हणावें. म्हणजे एक प्रकार चैतन्यरूप आकाश, दुसरा प्रकार चित्ताकाश किंवा हृदयाकाश, आणि तिसरा प्रकार भूताकाश. सरासरी जगज्जीवेश्वरात्मक हा सर्व एकंदर प्रकार प्रकाशरूपच आहे. आतां एका रीतीनें हा कसा दिसतो ह्मणाल तर तुपानें भरून ठेवलेल्या कासंडींत जसें एखादे वेळेस तें तूप, कांहीं अगदी पातळ, कांहीं अगदीं घट्ट आणि कांहीं त्यांतल्यात्यांत अनेक कणरूप, पण तें दिसण्यांत विलग अशा प्रकारचें तें तूप असतें. म्हणजे वर, खालीं, मध्यें सर्वभर तें तूप तर अगदी एक समरस स्निग्धस्वभाव असेंच असतें, पण उगाच दिसण्यांत मात्र चमत्कार.

त्याप्रमाणें हा सर्व आपला आपल्या ठिकाणीं तुडुंब भरलेला असा एकसमरस प्रकाशच प्रकाश केवळ आहे; पण त्यांतल्या त्यांत खालीं घट्ट, वरती पातळ; आणि घट्ट व पातळ यांचे दरम्यान विचित्र पदार्थ ह्मणून कांहीं भासरूप अनेक कण; तथापि एकंदर संपूर्ण तो प्रकाशमात्रच आहे. तरीपण इतकें मात्र ध्यानांत ठेवावें कीं, मुख्य स्वयंभानरूप आणि निरपेक्ष अनंतापार चैतन्यप्रकाशसंज्ञित आकाश-मंडलाच्या पोटांत हें कल्पित देशरूप सूक्ष्म हृदयाकाश आणि स्थूल भूताकाश स्फुरत आहे. आतां या दृष्टीनें पाहतां वायु, तेज, आप, आणि पृथ्वी हीं चार भूतेंही याच स्थूलसूक्ष्मरूप कल्पित आकाशाचे पोटांत त्याचेच अवान्तर प्रकार ह्मणून भासत आहेत. म्हणजे पुनः मुख्य चैतन्यसंज्ञित प्रकाशच, त्रिगुणाकार किंवा पंचभूताकार अशा अनेक प्रकाशाचे रूपानें विलसत आहे, हें रहस्य जो समजेल तो धन्य!

पुनः, हें सर्व अनेकाकार जगत् ह्मणजे नाम आणि रूप इत-केंच काय तें आहे असें जें आम्ही म्हटलें आहे, त्यांतील असाही एक अभिप्राय आहे कीं, जसें नाटक म्हणजे दृश्य, श्रोतव्य आणि उच्चार्य अशा स्वरूपाचें असतें, तसें हें जगत् ह्मणजे एक बिलक्षण चमत्कारास्पद नाटक आहे. अर्थात् जगत् ह्मणजे दिसण्यापुरतें, ऐक-ण्यापुरतें आणि बोलण्यापुरतें, इतकेंच; यापलीकडे जगत् ह्मणून आणखी कांहीं तत्वार्थ नाहीं. अर्थात् तें सर्व भासमात्र सोंग आहे ह्मणजे मिथ्या आहे; तथापि दिसणें, ऐकणें, उच्चारणें इत्यादिरूप जें लौकिक नाटक तें मूळ दीपप्रकाशावांचून जसें नाहीं, अर्थात् त्या दीपाचे प्रकाशांत तें नाटक म्हणून एक चमत्काररूप सर्व भासच; तसें आपल्या चैतन्यरूप अखंड दीपप्रकाशाचे जीवावर हें सर्व जगत्नामक भासमात्ररूप एक सोंग आहे. ह्मणजे निरनिराळ्या स्फुरणाकार वेषांनीं तें नटनमात्रच आहे. अशा दृष्टीनें पहातां प्रत्येक नामरूपात्मक भासरूप पदार्थ-

मूर्ति ह्मणजे ती त्या चैतन्यात्मक अमूर्त परब्रह्मात्मरूपाचीच नानाविध स्फूर्ति असा भावार्थ आहे. प्रत्येक पदार्थरूप मूर्ति चित्प्रकाशस्वरूपच आहे. पुढील गीतावाक्य हेंच रहस्य सांगत आहे.

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥

ह्मणजे पदार्थमूर्तिरूप मिष कोणत्याही प्रकारचें असलें तरी अधिष्ठानभूत चैतन्यसंज्ञित परब्रह्मात्मप्रकाश निर्दोष आणि समरसच आहे अशी ब्रह्मतत्त्ववेत्त्या पंडितजनाची दृष्टि असते; परंतु अप्रबुद्धास ती दृष्टि नाहीं, ह्मणून ती समरसता त्यास बाणत नाहीं. तेव्हां त्यानें आतां अशा प्रकारच्या मूर्तिची उपासना केली पाहिजे की, जिची उपासना परिपूर्ण केली असतां ती समरस ब्रह्मात्मसंज्ञित चैतन्यप्रकाशमयता याला पटून बाणूं लागेल. तशी मूर्ति येथें कोणाची आहे? अर्थात् हरिहरांची, रामकृष्णादिकांची, महालक्ष्मीची, महासरस्वतीची, महागणपतीची इत्यादिक कोणा तरी एका प्रकारच्या देवतेची मूर्ति यानें स्वरुचीच्या अनुसार इष्ट समजून तिचीच अनन्यभावानें उपासना करावी. येथें देखील असें रहस्य आहे कीं, आतांच ज्याप्रमाणें या उपासकाचे अंतरंगांत अमूर्त चैतन्यप्रकाशरूप अशा त्याचे जीवत्वावर ही प्रत्यक्षदृष्ट आंतरबाह्य त्याचीच शरीररचना किंवा मूर्तिरूपता असते, पण ती अगदीं निकृष्ट जातीची असते; त्याचप्रमाणें त्याच्या त्याच व तसल्याच जीवत्वावर स्वताच्या निकृष्ट मूर्तिरूपाचे ऐवजीं उत्कृष्ट देवतासंज्ञित दिव्यलावण्यमय मूर्तिची रचना करून घेणें आहे. चैतन्यप्रकाशरूप जीवत्व तर एकच समरस आहे. ह्मणजे ज्या अंगावर सत्रा ठिगळें दिलेलें, दंड घातलेलें, छिद्रें पडलेलें वस्त्र नेसल्यानें हा दरिद्री आहे असें ठरतें, त्याच अंगावर महामूल्य पीतांबरादिक महावस्त्राचें आच्छादन असल्यास हा श्रीमंत बनतो, तोच

न्याय सरीसरी इकडे आहे; ह्मणजे अंग तर मुद्दल एकंच, परंतु कष्टसाध्य धनसंपादित वेष मात्र वेगळा. त्यावरच हा दिलखूष होऊन आनंदित होऊन जातो, आपण श्रीमंत झालों असें यास वाटूं लागतें. त्याप्रमाणें या देवतामूर्तिचा एक पायगुणच असा कीं, अनंतकाळ केलेल्या उपासनारूप प्रयत्नवशात् तशी देवतामूर्तिची याचे जीवत्वाच्या मूळ मुद्दल स्वरूपावर आंतून आविर्भाव होत गेल्यानें आणि बाहेरून श्रीगुरूच्या ज्ञानार्पणरूप प्रसादानें यास ती दृष्टि मिळते; मग सहजच याला सर्वत्र समरस, शुद्ध आनंदमय प्रकाशाची दिवाळीच होते. आतां अशी दिव्यदेहाची देवतामूर्ति याचे ठिकाणीं प्रसन्नपणें थाटून सिद्धपणें बनून उभी होण्यास गुरुकिल्ली अवश्य पाहिजे. ती अशी कीं, गुरुसंप्रदायपूर्वक यानें त्या इष्ट देवतामूर्तिची मंत्रनामात्मक दीक्षा संपादन करावी अर्थात् वेदशास्त्रोक्त कांहीं विशिष्ट मंत्रानें किंवा केवळ नाममंत्रानें याची सर्व कार्यसिद्धि होणार. इष्ट देवतेच्या रूपाचें, आंतून मनानें आणि बाहेरून दृष्टीनें ध्यान ह्मणजे सांतत्यानें अवलोकन करीत असणें आणि मध्यमेनें किंवा वैखरीनें अखंड प्रवाहवत् मंत्रोच्चार करीत असणें, ही एक मोठी जडिबुट्टीच आहे, हें एक महावशीकरणच आहे. देवतेच्या सिद्धीचें हें एकच साधन आहे. श्रीमंतांचें वैभव, वस्त्रभूषणादिक इत्यादि पाहिलें म्हणजे आपल्यास तसें असावेंसें वाटतें, त्याचप्रमाणें देवतेचें सुंदर दिव्यमाहात्म्य समजलें ह्मणजे आपल्यास तिची अलौकिक प्राप्ति किंवा सिद्धि व्हावी असें वाटणारच; पर्यायानें असें ह्मणावयाचें आहे कीं, आपल्यास तद्रूपता असावी असेंच यांत इंगित आहे. दरिद्रि मनुष्यास आपण श्रीमंत व्हावें असें वाटल्यास त्यांत कांहीं मोठी चूक नाहीं, त्याचप्रमाणें या मनुष्यास देवतेची प्राप्ति ह्मणजे देवत्वसिद्धि व्हावी, आपण देवरूप व्हावें असें वाटल्यास चांगली गोष्ट आहे असेंच ह्मटलें पाहिजे. ही

गोष्ट सिद्ध होण्यास ती पूर्वोक्त गुरुकिल्ली अवश्य पाहिजे. देवतेच्या नामरूपाचे चिरकाल सेवेचा महिमा असा कांहीं विलक्षण आहे कीं,

ध्यानीं ध्यातां पंढरीराया, मनासहित पालटे काया ॥
ज्यासि ज्याचें ध्यान, तेंचि होय त्याचें मन ॥

सारांश, हाही एक प्रकारचा योगाभ्यासच आहे. तोही अत्यंत व्यवस्थित रीतीनें केला पाहिजे. एकान्तांत शुचिर्भूतपणें आसन ठोकून भावनामय मूर्तिरूप उभें करून प्रेमभरानें बीजाक्षराचा अर्थ ध्यानांत ठेवून उच्चारांत गर्क होऊन जावें. अभ्यासाच्या प्रतापानें काय काय होईल हें आम्हांस वर्णन करतां येत नाहीं, असो. जीवाचें मन नादांत आणि रूपांत मोठें लुब्ध होऊन जातें. हीं दोन्हीं तत्त्वें या उपासनेंत आहेत. किंबहुना ती देवताही मंत्रमय आहे म्हणून बीजाक्षराचे उच्चारांत यानें मुसंडी मारीत जावी, घुसत जावें म्हणजे सर्व कांहीं होतें. उच्चार म्हणजे ध्वनि, ध्वनि म्हणजे नाद; अर्थात् नाद पाहिजे म्हणजे नादानें रूप सिद्ध होतें. ध्वनिपासून रूप बनतें असा अनुभवशास्त्राचा सिद्धान्त आहे. चमत्कार असा कीं, या मनास ज्या नामरूपाचा वेध लागतो, त्याच नामरूपाकाराचें तें बनून जातें, हें कोणताही परिहार देऊन सांगावयास नको आहे; तेव्हां ज्याच्या मनास जें व्हावेंसें वाटेल त्यानें त्या नामरूपाचा ध्यान धरावा, म्हणजे तें आपलें मन तसें हटकून व्हायचेंच. अमुकच एक स्वभाव या मनाचा त्रिकाळीं अबाधित आहे असा प्रकार नाहीं. स्वभाव हा दुरतिक्रम आहे असें नेहेमीं बोलण्यांत येत असतें. हें थोडेंसें खरेंही आहे. पण आपण तो बदलावयाचा असा निश्चय करून, त्याचा उपाय केला म्हणजे तो बदलतो. नाहीं तर चांगल्याचें वाईट होणार नाहीं, आणि वाईटचें चांगलें होणार नाहीं. जें एकदां चांगलें तें चांगलेंच, आणि वाईट तें वाईटच, असाच न्याय झाला असता; परंतु वाई-

टाचें चांगलें होतें, आणि चांगल्याचें वाईट होतें, असा प्रत्यक्ष अनुभव आहे. यावरून स्वभाव ह्मणजे एक ठरून बसलेला नियम इतकाच अर्थ आहे. पण नियम जड आहे, अर्थात् स्वभावही जड आहे; नियम आपण करतों, ह्मणजे आपणच स्वभावास बनवितों. रहस्य इतकेंच कीं, तो चिरकाल प्रवाहवत् रहात गेल्यामुळें बदलतां येत नाहीं अशी आपली समजूत होऊन बसते. आपणच त्यास मूळ बनविलें आहे ही गोष्ट आपण विसरून जातों, अशा रीतीनें स्वभाववादास थोडासा जोर येतो. परंतु प्रयत्नवादानें त्या वादास चीत केलें आहे. तेव्हां हें मन वाईट होईल, किंवा चांगलें होईल; याकरितां एकदां वाईट आणि चांगलें यांच्या पलीकडे जाईपर्यंत मन चांगलें ठेवण्याबद्दल फार फार जपावयाचें आहे, असो. केवल अखंड चैतन्यैकरस जें ब्रह्मात्मपद, तें पापपुण्यातीत आहे, तें तर सर्व परस्परसापेक्ष द्वैतकल्पनेच्या पलिकडे आहे, तेथें शेवटीं मजल पोंचेपर्यंत हें मन उत्तरोत्तर अधिक चांगलेंच करीत गेलें पाहिजे. अर्थात् तशा ब्रह्मपदाचे लाभास तें अधिकारी ठरत नसेल तर देवतेच्या मूर्तिपदास तरी हें पावो अशी सज्जनशास्त्रकार आशा करीत आहेत. मरतांना याचें मन जर केरसूणीवर गेलें तर त्यास शिंदीचें झाड झालें पाहिजे, आणि नारायणाचें स्मरण झालें तर तें नारायणाचेंच पदास पावावयाचें, असा बिनचूक हिशोब ठरून गेला आहे. या न्यायानुसार या जीवानें उपास्य देवतामूर्तीच्या नामरूपाचाच ध्यास धरला पाहिजे. कारण, नामरूपांहून तात्त्विक देवता ह्मणून याचे जवळ आज प्रत्यक्ष कांहीं नाहीं, ती कालान्तरीं साध्यरूप आहे. अशा चिरकाल, किंबहुना बहुजन्म यानें तिच्या नामरूपाचा ध्यास धरला तरच तशा देवतेच्या साक्षात्कारास ह्मणजे देवपणाच्या अनुभवास हा पात्र होतो; तितक्या पूर्णावस्थेस पोंचला तर खरें तत्त्वज्ञान यास मिळालेंच

पाहिजे. पण याचा मुद्दा आपलें तात्त्विक निर्भय, निर्द्वन्द्व, आनंदात्मक अखण्ड कल्याण व्हावें इतकाच असेल आणि देवतेच्या अवान्तर वैभवावर याचा कटाक्ष नसेल, त्याचप्रमाणें तिचा आकार ह्मणजेच ब्रह्म असें याच्या मनोवृत्तिमध्यें आवेशाचें वारें भरलें नसेल, आणि केवल मुद्यांशीं गांठ ठेवून तिजपुढें निष्कपट भावानें हा सद्धर्माचरणपूर्वक तदेकचरणास शरण होऊन बसेल तर ती देवता याला समाधानाचें निधान अर्पण करतेच करते. सगुण साकार मूर्तीच्या सायुज्य अवस्थेला हा आला, तितकी उपासना करण्यांत शिणला तरच ती अनुग्रह करूं इच्छिते, नाहींतर ती याची उपेक्षा करूं पाहते असें इतकें कांहीं तिचें हृदय निर्दय नाहीं, ती म्हणजे याचा आत्माच आहे. याच्या जीवत्वाचे स्फूर्तीस आधारभूत जें एक अनंतापार स्वयंसिद्ध सत्तामात्रस्वरूप, तेंच याच्या देवतेचें वास्तविक स्वरूप आहे, आणि ज्याअर्थी केवल मनाच्या कल्पनेनें हा त्यापासून वियुक्तसा आपल्यास मानीत असल्यामुळें दुःखरूप होतो, त्याअर्थी ती कल्पना सुटली, आणि त्या आपल्या ईश्वरीय, दैविक सत्तामात्र चैतन्यमात्र अशा स्वरूपीं प्रबुद्धपणें अनन्य मिळून गेला, तर हा तत्त्वतः शुद्ध सुखरूप आणि आनंदीं आनंदरूप होतो; नाहीं तर हा सदा भयदुःखांनीं अत्यंत व्याकुलच असणार, हा सर्व प्रकार त्या सर्वज्ञ ईश्वररूप देवतेस माहीत आहे; आणि ह्मणून ती याचा भाव आणि सारग्राहि बुद्धिप्रबोध पाहून याजवर अनुग्रहच करूं लागते. अर्थात् याचें चित्त शुद्ध आणि स्थिर होऊं लागतें, आणि हळूहळू त्यांत विवेक उपजूं लागतो, त्यामुळें यास असें वाटूं लागतें कीं, आपल्याला त्या ईश्वरीय त्रिगुणमायेच्या शक्तिमाहात्म्याशीं आणि तिचे गुणवैभवाशीं काय करावयाचें आहे? अर्थात् अशा त्याच्या अवस्थेंत ती देवता आपल्याच श्रीगुरुसंज्ञित प्रबुद्ध मूर्तीच्या मुखांतून वेदसंज्ञित मंगल वाणीनें याला

तत्त्वज्ञान देऊन सद्योमुक्त करते. ह्मणजे हा तत्काल मोक्षपदाचा अधिकारी होतो. नाहींतर याच्या प्रबल अज्ञानमोहमूलक दुराग्रहास्तव उपासनेच्या प्रखर चरकांतून याला ती पिळून पिळून काढून क्रमाक्रमानें मुक्तिपदास आणते. ह्मणजे याला मायामय वैभव दाखवीत भोगवीत आणि शेवटीं त्याचे क्षयिष्णुत्वादिक आणि मिथ्यात्वादिक दोष याला भासवून वैराग्य उपजवून ज्ञानद्वारा मुक्त करते. अर्जुन आणि उद्धव हे आत्मतुल्य निःसीम सख्यभक्त! परंतु अखेर तत्त्वज्ञानेंकरूनच त्यांना अखंड आनंदरूप समाधानपदास किंबहुना मोक्षपदास आणावें लागलें, असो. मुद्दा असा आहे कीं, देवतेच्या एका सगुण, साकार, सजीव अशा विशिष्ट मूर्तीच्या उपासनाबलानें थोडा लवकर किंवा थोडा सविलंब, कसातरी हा सद्गतीलाच पावतो, ह्मणून तिच्या नामरूपाचा निदिध्यास याला लागावा हें सर्वथा इष्ट आहे. हा श्रद्धेचा धड आणि सप्रेमभक्तीचा पुरा असल्यास ही उपासना याला सुकर आहे. याजमध्यें जसें जसें सत्त्वाधिक्य होत जाईल तशा तशा याला सुखमयतेच्या गुदगुल्या होऊं लागल्यानें याचें अंतःकरण अधिक अधिक आवेशानें निदिध्यासांत घुसत असतें हें विशेषतः सांगावयास नकोच आहे. या अभ्यासांत किंवा उपासनेंत गूढ कांहीं एक नाहीं. हा मार्ग अगदीं निष्कंटक आहे. हा अगदीं सरळ पंथ आहे. हा सर्व उजेडाचा मार्ग आहे. ह्मणजे अगोदर हा उपासक जीव तर शुद्ध चैतन्याचा प्रकाश, देवतेचें अंतर्यामही चित्प्रकाशस्वरूप; तिचा नामध्वनि ह्मणजे हाही आकाशसंज्ञित एक विशेष प्रकाशच आहे, आणि तिचें तें उज्ज्वलरूप ह्मणजे साक्षात् तेज, अर्थात् हाही एक प्रकाशच; आणि शेवटीं या नामरूपाचा जो हृदयांत निदिध्या[illegible] तो तर टळटळीत चैतन्यानें परिपूर्ण असा बुद्धिसंज्ञित एक प्रकाशच आहे, तेव्हां हा सर्व उपासनापंथ प्रकाशानें

अतिशय संकुल झालेला आहे; आतां येथें अज्ञानांधकार उरण्यास किंवा शिरकण्यास तिळा इतकीही रिकामी जागा नाहीं. हा प्रकाश-मय संप्रदाय आहे. येथें आंधळे डोळस होतात आणि रत्नपरीक्षक होत्साते सत्कीर्तिप्रत पावतात, असो. गोड मंत्रनामसंकीर्तन आणि अर्थव्यक्ति ह्मणजे रूप, त्याचें ध्यान किंवा अनुसंधान, अशा या उभयात्मक साधनाचें अनुष्ठान प्रत्येक प्राथमिक अवस्थेच्या मुमुक्षुसाधकानें अवश्यमेव केलें पाहिजे. हें अनुष्ठान तरी किति महत्वाचें आहे हें वर्णन करण्यास आह्मांपाशीं तितकी वाक्शक्ति खरोखर नाहीं. हें साधन दिसण्यांत फार सोपें दिसत आहे, किंबहुना तें खरोखरच सोपें आहे; पण सोपें आहे म्हणून फलाविषयीं कृपण किंवा दुर्बल आहे अशी मात्र दुष्ट कल्पना कोणाची न होवो. भाविक लोकांना हें साधन फार त्वरितरीतीनें पटतें व मानवतें; परंतु शास्त्रज्ञ किंवा इतर विद्वान् आणि बुद्धिमंत लोकांस हें साधन बहुधा पटत नाहींच; या साधनाविषयीं ते साशंक असतात इतकेंच नाहीं, तर निरादर आणि सतिरस्कार असतात; म्हणजे त्यांस असें वाटतें कीं, अशक्त, रुग्ण, स्त्रिया, वृद्ध, शूद्र, चाण्डालादि हीन जातीचे, अशा लोकांनीं फार झालें तर या साधनाचा सादर स्वीकार करावा; या साधनाविषयीं तशा लोकांसच फक्त अधिकार आहे, असेंच त्यांचे मतीं असतें. विशेष खेदाची गोष्ट अशी कीं, हें साधन सर्वप्रमाणवर्य जो वेदपुरुष, त्यास संमतच नाहीं, अशी देखील यांची समजूत झालेली असते असें अनुभवास येतें. तेव्हां भाविक लोकांस तर याबद्दल विशेष सांगावयास नकोच आहे; परंतु बुद्धि आणि विद्या याबद्दल वृथा घमेंड बाळगणाऱ्या अशा लोकांस देखील वेदपुरुषाचें अने गंभीरपणानें कळकळीचें सांगणें आहे कीं,

तमुस्तोतारः पूर्व्यं यथाविद ऋतस्य गर्भं जनुषा पिपर्तन ।।

आस्य जानंतो नाम चिद्विवक्तन, महस्ते विष्णो सुमतिं भजामहे।
मर्ता अमर्त्यस्य ते भूरि नाम मनामहे विप्रासो जातवेदसः।
म्हणजे आपले वेदपुरुष, ऋग्वेदाच्या दुसऱ्या अष्टकांत मंत्रद्रष्टचा ऋषींच्या मुखानें असें म्हणतात कीं, हे विद्वज्जनहो! तुम्ही यथार्थतत्त्ववेत्ते आहांत, त्याअर्थी तुह्मांला जसें समजेल तसें, यथाशक्ति यावज्जीव त्या विश्ववंद्य पुराणपुरुषोत्तम, अनादिनिधन, अबाधितस्वरूप आणि सकलजगदुत्पादक अशा विश्वव्यापक महानुभाव परमेश्वराचें स्तवन करणारे व्हा, स्वाभाविकपणें म्हणजे निष्कामबुद्धीनें त्याची स्तोत्रादिकांनीं तृप्ति करा, त्यास संतुष्ट करा, त्याची प्रीति संपादन करा, तुम्ही समंजस आहां, तेव्हां तुम्हांला विशेष काय सांगावें! तुम्ही अर्थज्ञानपूर्वक त्या वंदनीय भगवंताचें मंत्रनामपरायण निश्चयानें करा, तो तर सर्वांचें चैतन्य आहे, आत्मा आहे; तो जीवनकला आहेच, परंतु त्याचें नामही चैतन्य आहे, निश्चयानें ही गोष्ट ध्यानांत ठेवा, त्याचें मंगल नाम हा जिव्हाळा आहे. तो मंगल नाममंत्र प्रकाशच आहे, परमेश्वर जरी सर्वांचा प्रकाशक असा प्रकाशच आहे, तरी त्याची ओळख करून देण्यास, त्याचा तो नाममंत्रच येथें मूळ प्रकाश आहे. हे निरातिशयमहत्स्वरूप महाविष्णो, आम्हांला तुझी बुद्धि असो, तुझें ज्ञान असो; म्हणजे तुझी भक्ति घडेल, आम्ही सर्वज्ञ आणि लब्धसर्ववैभव जरी झालों तरी आम्ही मर्त्य आहों, मरणभयानें आक्रांत आहों, तूं मृत्युंजय आहेस, तूं जन्ममरणभयातीत आहेस, अविनाशी आहेस, आम्हांस तुझें केवलनामसंकीर्तन हेंच साधन फार महत्त्वाचें वाटतें, आम्ही हृदयांत तेंच आठवितों, आणि त्याचाच विचार करितों, आह्मांस त्याचीच अतिशय उपासना घडो, हीच आह्मी आशा करून आहों. तेव्हां अशा रीतीनें प्रत्यक्ष वेदपुरुषच देवाची प्रार्थना करीत आहेत. यावरून नामसं-

कीर्तन हें साधन शिरसा मान्य करून विद्वानांनीं आणि मूर्खांनीं, प्रबलांनीं आणि निर्बलांनीं, बालांनीं आणि वृद्धांनीं, ब्राह्मणांनीं आणि चांडालादिकांनीं, पुरुषांनीं आणि स्त्रियांनीं अखंड भगवन्नामाचा घोष करावा; त्याच्या रूपाचें ध्यान करावें; निदान वाचक जें नाम आणि वाच्य जें अर्थभूत स्वरूप यांत भेद मनांत न ठेवतां, आणि हे दोन प्रकार म्हणून दोहींकडे लक्ष पुरविण्यांत द्वेधा आणि लेधा होण्याची भीति न बाळगतां, ही आपली परम देवता मंत्रमयच आहे असें रहस्य ध्यानांत घेऊन एकाग्रपणें सतत लक्षपूर्वक मनोमय उच्चारण करण्यांत अगदीं निर्भर, अगदीं बेसुमार गढून जावें. जगदुद्धारक आणि धर्मसंस्थापक असे श्रीरामकृष्णादिक अवतारि महापुरुष, श्रीमच्छंकराचार्यप्रभृति ते ते संप्रदायप्रवर्तक आणि श्रीसमर्थज्ञानेश्वर-तुकारामादिक महासाधुपुरुष या नामसंकीर्तनात्मक साधनाविषयीं किति तरी कळकळीनें उपदेश करीत आहेत याबद्दल कोणाही शंकितानें त्यांच्या ग्रंथांचे द्वारा आपली बालंबाल खात्री करून घ्यावी. मूर्त्युपासनेंत हेंच प्रधान अनुष्ठान आहे, पूजादिक दुसरीं अनेक उपांगें आहेत, तरी त्यांचें येथें विवेचन करण्याची आवश्यकता आम्हांस वाटत नाहीं, यथाशक्ति आणि यथासंभव कांहीं नियमितपणें त्यांचें अनुष्ठान करावें; त्यांकडे दुर्लक्ष व्हावें असा अभिप्राय सर्वथा नाहीं. पण प्रधान अनुष्ठान नामरूपाचें भजन हेंच आहे. अर्थात् देवतेचें ध्यानपूर्वक मंत्रनामाचें हृदयांत संकीर्तन करण्यांत अव्यग्रपणें ठाण मांडून जों जों अधिक काल अभ्यास होईल तों तों याचा अधिकार वाढून हा कृतकृत्यतेच्या अंतिम भूमिकेस क्रमानें पावत जातो. तेव्हां अभ्यासच करीत गेल्यानें या साधनांतील जे प्रत्यक्ष अनुभव मिळत जाणार, त्यांचा अनुवाद तरी करण्याचें कारण काय आहे? म्हणून मुमुक्षु उपासकानें कोणास न विचारतां एकदम अ-

भ्यासच सुरू करावा अशी त्यास आमची हात जोडून प्रार्थना आहे. अगदीं मंदबुद्धीच्या उपासकास तर यापेक्षां दुसरें कोणतेंही साधन आमच्या मतीं प्रशस्त दिसत नाहीं. इतर व्रतें आणि नेमधर्म तर या साधनापुढें रंक आहेत, असो; अशा रीतीनें हा ईश्वरोपासनात्मक चतुर्थ भाग आतां समाप्त होत आहे. यांत आम्हीं अगदीं प्रथम असें सांगितलें आहे कीं, उपास्य ईश्वराच्या आणि उपासक जीवाच्या स्वरूपांत लक्षणसाम्य पूर्ण आहे, तेव्हां तें नीट ध्यानांत घेऊन या उपासकास त्या ईश्वराचा सहज नित्य अनन्य अपरोक्ष साक्षात्कार आहेच आहे; तो तसाच जागरूक असणें ही ज्ञानिभक्ताची सहजावस्थारूप उपासना होय; आणि त्या पुढें तो परमेश्वरच हें सर्व विश्वसंज्ञितरूप आहे असा शास्त्रोपदिष्ट विचार मनांत आणून त्याप्रमाणें जी उपासना करणें ती विश्वरूपोपासना म्हणून या ईश्वरोपासनेचा दुसरा प्रकार आम्हीं सांगितला; आणि त्यापुढें परमेश्वराच्या एखाद्या विशिष्ट मूर्तीची उपासना म्हणून हा त्याच्याच उपासनेचा तिसरा प्रकार अगदीं शेवटीं सांगितला, असे या ईश्वरीय उपासनेंत तीन अधिकार आमच्या मतें ठरतात, यांपैकीं आपला कोणता अधिकार आहे तो विचारानें ठरवून त्याप्रमाणें उपासना करीत गेलें पाहिजे. किंबहुना हा उपासनाभाग नीट संपूर्ण लक्षांत घेऊन तिन्ही कक्षेंत कोणत्याही उपासकास तारतम्यानें संचरण करतां येणार नाहीं, असें कांहीं आम्हांस वाटत नाहीं, असो. एकंदरींत, आपण काय व्हावयाचें किंवा तसें होण्याबद्दल प्राधान्यतः मनानें अंतरंगांत सतत काय करावयाचें ही गोष्ट आपल्यास उपासनाशास्त्र सांगतें; आणि तसें होण्याबद्दल प्राधान्यतः शरीरानें आणि दश इंद्रियांनीं काय करावयाचें ही गोष्ट कर्तव्यकर्मशास्त्र सांगत आहे. परंतु इतक्याही उपर किंवा इतक्याचेही अगोदर आपण जसें असा-

वयाचें तसें सहज आहोंच ही रहस्याची गोष्ट विवेकपुरःसर ज्ञानशास्त्र सांगतें, अर्थात् ज्ञानदृष्टीनें जें जसें आपण सहज आहों, तेंच आणि तसेंच मनानें व्हावें आणि असावें. त्याचप्रमाणें शरीरद्वारा इंद्रियांनीं करावें, व्हावें आणि असावें, एवंच बुद्धीनें किंवा डोक्यानें ज्ञान विचार प्रदेशांत, मनानें किंवा हृदयानें उपासनाप्रदेशांत आणि शरीरेंद्रियांनीं सत्कर्मसदाचारप्रदेशांत अश्रान्त राबून आपापली कृतार्थता स्थापित करावी. अर्थात् जेणेंकरून या तिहींत परस्परांमध्यें अविरुद्धता, ऐक्यसंगति, एकरूपता होईल, त्या रीतीनें सर्व मुमुक्षु जीवांनीं असलें पाहिजे. येणेंप्रमाणें हा चतुर्थ भाग येथें समाप्त झाला. आतां ज्या अबाधित, शश्वद्वर्तमान आणि अत्यंत पारमार्थिक अशा वस्तुस्थितीच्या लाभाकरितां ह्या उपासनाभागांतील तिन्ही कक्षा उपदिष्ट झाल्या, किंबहुना पूर्वोक्त सर्व भाग वर्णिले गेले, ती निःसीम तात्त्विक वस्तुस्थिति कशी अकृत्रिम सिद्ध आहे ही कथा पुढील पंचम भागांत होणार आहे, तेव्हां कोणताही साधनपक्षपात किंवा सांप्रदायिक मताग्रह न करतां ती कथा मनोबुद्धीच्या कानांनीं सादर श्रवण करण्याकरितां सर्वांगसिद्ध आणि अतिसावध असावें अशी या जीवास आमची अतिशय प्रेमपूर्वक सूचना आहे.

चतुर्थ भाग समाप्त झाला.

पंचम भाग.

न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ।
न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता ॥

कल्पनेचा देव कल्पनेची पूजा, तेथें कोणी दुजा आढळेना ।
आढळेना देव आढळेना भक्त, कल्पनेरहित काय आहे ।
आहे तैसें आहे कल्पना न साहे, दास ह्मणे पाहे अनुभवें ।

येथें वास्तविक परमार्थ तत्त्व काय आहे हें या शिरोवाक्यांवरून चांगलें ध्यानांत येण्यासारखें आहे, वास्तविक शुद्धपरमार्थसिद्धांत असा आहे कीं, येथें कोणी बद्ध नाहीं; ह्मणून मुमुक्षुही कोणी नाहीं, अर्थात् साधक कोणी नाहीं आणि मुक्तही कोणी नाहीं; जन्ममरणरूप किंवा उत्पत्तिप्रलय-रूप संसार म्हणून कांहींच वास्तविक अर्थ नाहीं, असाच कांहीं एक विलक्षण परमार्थभावार्थ आहे. तसेंच देव आणि भक्त, पूजा आणि प्रसाद, बंध आणि मोक्ष, इत्यादि सर्व प्रकार कल्पनेचा फक्त विलास आहे. कल्पनात्मक वाचारंभ जर नसेल, तर मग जसें असावयाचें तसेंच सर्व आहे. ह्मणून कल्पनेचा बाजार तेवढा नसावा, म्हणजे अखंड समरस आनंदीं आनंदच मग सर्व आहे. हा असाच सच्छास्त्रसज्जनांचा अनुभव आहे; तेव्हां खरें कीं खोटें हें इतरानींही अनुभव घेऊन पहावें म्हणजे बरें. आपल्याहून भिन्न ह्मणून कल्पनेनें कांहीं ठरवून ज्या कोणाची आपण इच्छा करावी, जो आपल्यास असावा म्हणून त्याविषयींची उत्कट चिंता लागावी, असा कोणताही पदार्थ मग तो असो, त्याची किंमत त्याच्या योग्यतेप्रमाणेंच ठेवावी; त्या इच्छेला, त्या मूळ कल्पनेला किंवा कल्पनेनें इष्ट म्हणून पुढें उभें केलेल्या अर्थाला ह्मणजे विषयाला आपल्या डोक्यावर घेऊन आपण त्याच्या-

खालीं दडपलें जाऊन जणों नाहींसारखेंच होऊन जावें, हा एक प्रकारचा अतिनिंद्य आत्मघात आहे, हा अक्षम्य आत्मपात आहे! आगंतुकाला आपल्या येथें थारा देऊन त्याचें वर्चस्व व्हावें आणि मूळच्या मालकाचा पत्ताच नसावा हें कोणाही स्वसत्ताक स्वाभिमान्यास कधींही कबूल नाहीं. त्याचप्रमाणें आपण आपल्या ठिकाणीं अकल्पितसिद्ध सहजशांत आणि निरुपचारतृप्त, कामसंकल्पवेदनाशून्य असे असतांना केवल आगंतुक कल्पना यावी, तिला आपल्या सत्तेच्या जागेंत असूं द्यावी, आपल्या घरच्या ह्मणजे स्वताच्या स्फूर्तिप्रभेनें प्रकाश पुरवावा, तेवढ्यांत तिणें आपलें अंग मुधरावें, तिणें ठाण करावें, प्रथम सहज म्हणून प्रवेश करावा, घर बांधावें, पाहिजेल तो व्यूह रचावा अशा रीतीनें व्यवहार ह्मणजे वहिवाट सुरू करावी, हक्कदार व्हावें आणि मालकाच्या सत्तेस धाब्यावर बसवावें इतका तिचा स्वैर धुमाकूळ चालू असावा! तोच हा अनंत सुखदुःखमय, पापपुण्यकर्मरचित जन्ममरणयातायातरूप बन्धमोक्षदुरंतचिंतामहाधाम, नियम्यनियामकशृंखलाग्रथित भयशोकसंमोहसंकुल असा असार दुर्निवार संसार!!! तो हा मूळ एका कल्पनेच्या द्वारा आलेला सर्व अर्थ! अहो याला अर्थ असें तरी काय म्हणावें! हा सारा अनर्थ! एरवीं सोसच असेल तर अर्थ ह्मणून पाहिजेल तर म्हणा, पण परम अर्थ ह्मणजे परमार्थ असें मात्र त्यास कधींच ह्मणतां येणार नाहीं. अर्थात् अत्यंत वास्तविक तत्त्वार्थ त्यास कोणीही विचारी पुरुष ह्मणणार नाहीं. आतां तसा परमार्थ तरी कोणता व कसा आहे हें अनुभवाच्या डोळ्यांनें जो कोणी पाहील त्यास तो दिसेल, इतकेंच नाहीं तर असा त्याचा विचार करणाराच तो परमार्थ आपण स्वतः आहों असें माप त्याचे पदरीं पडेल. रत्नाचा शोध करणाराच येथें रत्न ठरतो; येथें मथन

करणाराच नवनीत आहे. येथें क्षुधितांच अन्न आहे आणि तृषितच निजजीवन आहे! तात्पर्य परमार्थाचा इच्छुच येथें वास्तविक परमार्थ आहे हें रहस्य ध्यानांत आणून त्यानें अखंड निर्भय आणि स्वस्थ असावें, आनंदीं आनंदरूप रहावें. अर्थात् ज्याचा तोच स्वतः परमार्थरूप आहे. कारण, इतकें तर खरें कीं, आपल्याकरितां सर्व कांहीं, आपल्याकरितां हीं अनंत ब्रह्माण्डें. आपण या सर्वांचें निदान, आपण या सर्वांचें प्रयोजन, आपण या सर्वांच्या पर्यवसानाचें स्थान. आपल्या मूळ असण्यावर या सर्वांचें अस्तित्व. तेव्हां आपणच वास्तविक परमार्थ, आपणच तत्त्वतः सत्यार्थ; इतर सर्व तुच्छ, मिथ्या असाच प्रकार आहे. आपल्याहून जें हें इतर सर्व, यास जो महिमा आला आहे तो आपणा निमित्तक. अर्थात् आपलाच तो महिमा. एरवीं त्या इतरास महिमाच नाहीं. कारण, तें इतर सर्व कांहीं नाहींच. अगोदर आपण ह्मणजे काय, तर शुद्ध आत्मा; आणि बाकीचें सर्व ह्मणजे ज्याला आपण दृश्यभासरूप जगत् म्हणून समजतों तें, अर्थात् पूर्वोक्त संसारजाल. या दृश्यभासात्मक जगताचें जें एवढें स्तोम माजलें आहे तें केवळ परमार्थभूत अशा आपल्या खुद्द निजात्मस्वरूपाकडून किंचित् कानाडोळा, किंचित् उपेक्षा म्हणून. एरवीं हा कानाडोळा न केला ही उपेक्षा न केली, आणि आपण आपल्या निजरूपाकडेच पूर्ण नजर देऊन परम पवित्र अशा स्वात्मसामर्थ्यानें त्यांतच गर्क होऊन गेलों, धुंद होऊन बसलों, तर मग हें जगत्स्तोम नांव देखील काढणार नाहीं. जगत् ह्मणजे स्वतः कांहींच नाहीं. निवळ भ्रमाचा भोपळा; त्याला सोलून आणि चाळून अगदीं गाळून पाहिलें तर तें कांहींच नाहीं, अत्यंत शून्य. त्याच्या भ्रमाचा भोपळा लवकरच "आतां फुटेल." त्याचें आतांच पोट फाडून पाहूंया ह्मणजे खात्री होईल कीं, त्यांत कांहींच नाहीं, ही गोष्ट आपल्याच निर्णयात्मक वेदरूप वाणीच्या अंतिम उद्गारांनीं प्रत्ययास येईल.

सारांश, संसारसंज्ञित हें जगत् म्हणजे केवळ भ्रमविलसित आहे. खरोखर संसार म्हणजे दोरीचा साप; शिंपींचें रुपें, मृगजलाचा डोह! म्हणजे तो हा जगत्संज्ञित संसार केवळ अज्ञानजनित आहे. म्हणजे, दोरीवर साप भासणें, किंवा शिंपीवर रुपें भासणें, येथें जसें ती दोरी किंवा ती शिंप, न कळल्यानें, म्हणजे त्यांच्याविषयींच्या न कळण्यापासून तो साप किंवा तें रुपें हीं भासापुरतीं उत्पन्न होतात. त्याचप्रमाणें हें संसाररूप सबंद जगत् आपल्या निजस्वरूपाविषयींच्या किंचित् अनुल्लेखात्मक आणि उपेक्षणरूप अशा कल्पनामात्रसिद्ध अज्ञानापासूनच उगवलें आहे, अशा त्या अज्ञानांतून आलें आहे. याचें थोडेंसें निरूपण करूंया. दृष्टान्तार्थ जगतांतील कोणताही पदार्थ म्हणजे नामरूपात्मक असा एखादा भास घ्या; तो काय आहे हें पाहूं लागल्यास शेवटीं कळत नाहीं अशीच स्थिति होते. म्हणजे येथें अज्ञान किंवा नकळणें हें त्या पदार्थाचे बुडापाशीं राहतें; तें कसें हें एका उदाहणावरून घ्यानांत येईल. पहा, हा कागदच कां होईना, हा काय आहे तें सांगा पाहूं कोणी! 'कळत नाहीं' हेच उद्गार प्रत्येकाचे तोंडून निघतात. आतां एकापेक्षां एकेक अधिक बुद्धिमंत असतात; तथापि कितीही कोणी बुद्धिमान् तर्ककुशल असला तरी 'मला कळत नाहीं' हे उद्गार त्यासही काढावे लागतात. म्हणजे साधारण बुद्धीच्या मनुष्यास 'मला हें कळत नाहीं' असें सांगण्यास जितका विलंब लागतो, त्याचेपेक्षां एखाद्या महापंडिताचे तोंडून तेच उद्गार निघण्यास फारच अधिक विलंब लागतो, इतकाच भेद! शेवटीं मलाही 'कळत नाहीं' ही पंचाक्षरीच त्यास उच्चारावी लागते. हें असो, सध्यां हा कागद काय आहे? त्याला कागद असें काय म्हणून म्हणावयाचें? म्हणजे हा पांढरा आहे म्हणून यास कागद असें म्हणायचें की काय? तसें

ह्मणणें असेल तर दूधहि पांढरें असतें. तेव्हां पांढरेपणाबद्दल यास ' कागद ' असें ह्मणणें युक्त नाहीं; किंवा कागद पांढराच असतो असेंहि नाहीं. बरें, हा चौकोनी आहे ह्मणून यास ' कागद ' असें ह्मणावयाचें कीं काय? तेवढ्याकरितां जर तसें ह्मणणें असेल तर पाटहि चौकोनी असतो. बरें, चिंध्या वगैरे जिन्नसांचा तो बनविला आहे ह्मणून त्यास ' कागद ' असें ह्मणायाचें कीं काय? असें असेल तर चिंध्यांच्या बाहुल्याहि होतात. बरें, यास कांहीं तरी वजन आहे ह्मणून ' कागद ' असें ह्मणावें कीं काय? तसें असेल तर वाण्याच्या दुकानांत प्रत्येक पदार्थाचें वजन केलें जातें. बरें, वजन, आकृति, गुण, धर्म, क्रिया, जाति, संबंध इत्यादिक त्यास आहेत ह्मणून त्यास ' कागद ' असें ह्मणावयाचें असेल तर कागदाहून इतर बहुतेक सर्व पदार्थांस ते गुणधर्मादिक भाव असतातच; मग यासच कागद असें काय ह्मणून ह्मणावें. तसेंच गुणधर्म, जाति, क्रिया इत्यादिकांची परीक्षा केली तरी त्यांचीहि लक्षणसिद्धि होऊं शकत नाहीं. गुण ह्मणजे काय तर जो द्रव्याश्रित असतो तो; आणि द्रव्य ह्मणजे काय तर जें गुणाश्रय तें; तेव्हां हे द्रव्यगुण पहा कसे अन्योन्याश्रयादिक दोषांनीं ग्रस्त लक्षणाचे पदार्थ आहेत ते! क्रिया ह्मणजे काय तर कर्त्याचे आश्रयानें असणारें जें चलनात्मक कर्म, त्यास क्रिया ह्मणावें, आणि कर्ता ह्मणजे काय तर क्रियेचा आश्रय. तेव्हां हा कर्ता आणि ती क्रिया हे पदार्थहि पहा कसे अन्योन्याश्रयादिक दूषणांनीं ग्रस्त आहेत ते! जाति ह्मणजे काय तर अनेक व्यक्तिसमाश्रित पदार्थ, आणि व्यक्ति ह्मणजे काय तर जातीचा आश्रयभूत पदार्थ; येथेंहि जातिव्यक्तिमध्यें तशीच दूषणग्रस्त लक्षणादिसिद्धि आहे! सारांश, जगांतील कोणताही पदार्थ घ्या, तो कोण, काय, कशाचा हें निर्वचन करतांच येत नाहीं. ' मला कळत

नाहीं ' असेंच शेवटीं ह्मणणें भाग पडतें. आजकाल भौतिक जड शास्त्रांची कितीहि प्रगति असो तरी ती अपूर्ण आहे; आणि अपूर्णच रहाणार; कारण मर्त्य देहाभिमानी मनुष्याची बुद्धि सर्वथा संकुचितच असणार; तेव्हां तिला बातावेतांचेंच कळणार. प्रस्तुत उदाहरणाकरितां हा पुढें घेतलेला कागद काय आहे तें 'मला कळत नाहीं' असेंच शेवटीं ठरलें. आतां अशा रीतीनें अज्ञान जेव्हां पुढें येतें तेव्हां विचारार्थ पुढें घेतलेला पदार्थ विचारवृत्तीपासून फार दूर होतो ह्मणजे तो भासेनासा होतो. त्याचा विचार करावयास लागण्यापूर्वी तो भासापुरता, बोलण्यापुरता तरी असतो; पण आतां तितकाहि तो उरत नाहीं. तो कोठें जातो हें विचार करतां तो अज्ञानांतच बुडतो. यावरून जेव्हां तो भासापुरता येतो तेव्हांही अज्ञानांतूनच तो उगवतो असें ह्मटलें पाहिजे. जसे तृणांकुर जमिनींतून उगवतात आणि जमिनींत लीन होतात; त्याप्रमाणें जर जगत् ह्मणून कोणताही पदार्थ अज्ञानांत निमज्जन पावतो तर तो त्या अज्ञानांतूनच डोकें वरतीं करतो असें ह्मटलें पाहिजे. ज्यापासून ज्याची उत्पत्ति, त्याच्यांतच त्याचा लय असा एक नियम आहे, ह्मणजे जें कार्य ज्या उपादानांतून उद्भवतें तें कार्य त्या आपल्या उपादानांतच नाश पावतें. एवंच प्रत्येक पदार्थ अज्ञानापासून होतो आणि अज्ञानांत संपतो, ह्मणजे पदार्थ ह्मणून उगीच कांहीं तरी आपली कल्पना; तेव्हां तो आपल्यास कळावा तरी कोठून! कल्पनेच्या, शब्दोच्चाराच्या पलीकडे जर तो कांहीं नाहीं, तर तो आपल्यास समजावा हें काय बोलणें! तो कळावा हें आपल्यास उगीच वेड लागलें आहे! अशा रीतीनें सरासरी ' मला कांहीं कळत नाहीं ' येथपर्यंत मजल आली

आतां पुनः ' मला कळत नाहीं ' यांत तरी दोन अंश आहेत. एक अंश तर '. मी, ' आणि दुसरा अंश ' कळत नाहीं ' ह्मणजे साक्षात्

' अज्ञानें. ' हें अज्ञान ह्मणजे इतर पदार्थांविषयीं अभान असा अर्थ तर ओघानें सिद्ध होत आहेच. आणि ' मी ' किंवा आपण स्वतः ह्मणून कोणी कांहीं एक लखलखीत स्फुरद्रूप उरत आहे हाही एक प्रकार सिद्ध आहे. तथापि ' मी ' ह्मणजे संस्कृतांत ज्यास ' अहं ' असें ह्मणतात; तोहि पण ' अहं' हा श्वासोच्छ्वासांत उमटणारा एक सहज ध्वनि आहे. तो झोंपेंत किंवा कुंभकात, इत्यादिक अवस्थेंत कांहीं लक्षांत येत नसतो, ह्मणजे त्याचेंही अभान होत असतें. बुद्धींत उल्लेखास येणारा जो ' मी ' ह्मणून शुद्ध जीवाचा प्रतिबिंबरूप आभास, तोही इतर पदार्थांप्रमाणें आगंतुकच आहे, ह्मणजे त्यालाही अभानाच्या पोटांत जिरवितां येतें; ' अहं ' ह्मणून प्रतिभासमान होणारी अभिमानवृत्ति, तिला तर सहजच या अज्ञानसंज्ञित अभानाच्या पोटांत आटवितां येतें. एवंच वास्तविक ' अहं ' ह्मणजे मी किंवा स्वतः आपण असा जो अर्थ आहे त्यांत अभिमानवृत्ति, किंवा जीवप्रतिबिंबरूप आभास यांचा समावेश करतां येत नाहीं. तेव्हां वास्तविक मी स्वतः आपण ह्मणून जो कांहीं एक अर्थ आहे, याचें स्फुरण मात्र कधीं कालत्रयीं देखील विझत नाहीं, इतका उत्कृष्ट रीतीनें तो मी मात्र आपण स्वतः स्फुरून आपले ठिकाणीं केवलपणें सारखा विद्यमान आहे. विशेष मौज अशी कीं, सुषुप्तिसारखी जड, मूढ, गाढ अवस्था, पण तिच्यांतील सुखमयता आणि तेथील सर्व जगद्भान या सर्व गोष्टींचा उल्लेख देणारा तरी स्फुरद्रूपस्वभाव असा मीच स्वतः आपण. त्या अशा मला माझें नाहींसेंपण चुकूनही मनांत आणतां येत नाहीं. अर्थात् असला जो ' मी स्वतः ' तो तरी ' मी ' इत्यादि शब्दार्थाच्या उल्लेखावांचून स्फुरद्रूपत्वानें विद्यमान असाच फक्त समजावयाचा आहे. ह्मणजे ' मी ' किंवा ' अहं ' इत्यादिक शब्दार्थरूपाचा जो ' मी ' त्याची आटणी

पूर्वोक्त अज्ञानांतच करतां येते. तेव्हां असा जो ' मी स्वतः ' त्याचें खरें स्वरूप आतां काय आहे तें कांहींसें योग्य शब्दार्थाच्या द्वारा आम्ही सुचवितों, पण त्या सूचक आगंतुक शब्दार्थास पूर्वोक्त अज्ञानांत आटवून अविषयत्वेंकरून तो जसा सिद्ध आहे तसा प्रज्ञ्जुतींत असावा, तसा मग त्यास खुशाल लक्षांत घ्यावा. एवंच त्या तशा ' मी ' ची खूण सुचविणारे किंचित् योग्य जे शब्दार्थ ते ' असणें आणि स्फुरणें, ' हे असलेच आहेत. ह्मणजे प्रत्यक्ष सत्तास्फूर्तिमात्रस्वरूप असा येथें तो ' मी स्वतः ' आहे. आतां या सत्तास्फूर्तिरूप अहंवस्तूला ठरावीक संकेत जो ' आत्मा ' त्या शब्दानेंच आम्ही प्रसंगीं बोलत जाऊं, ह्मणजे व्याख्यानास सोपें जाईल. सूचनार्थ वापरले जाणाऱ्या प्रत्येक शब्दार्थसंकेताची अज्ञानांत आटणी करावयाची ही अट मात्र नेहेमींच ध्यानांत ठेवून द्यावयाची, असो. अशा आत्म्याचे व्यतिरिक्त बाकी चटसारें अज्ञानांत आटून जाणारें असेंच आहे; आणि आत्मा ह्मणजे आपण मात्र आपल्या अबाधित अनन्य लक्षणानें नित्य वर्तमान आणि जागरूक असा आहे. एवंच एक मी आत्मा नित्य प्रकट विद्यमान स्वसंवेद्य आहेंच; पण दुसरें 'अज्ञान' म्हणून जें कळविलें तें ' मला कळत नाहीं ' अशा रीतीनें जरी वापरलें तरी त्याबद्दल मला कांहीं लांछन नाहीं; ह्मणजे मला कांहीं त्याबद्दल लज्जास्पद वाटत नाहीं, कारण, जे पदार्थ नाहींतच, ते न कळले, किंवा मजपुढें न प्रकाशले, याबद्दल मला कां खंत असावी ? वंध्यापुत्र कोणाही डोळसांस दिसत नाहीं म्हणून कोणा डोळसांस अंधळे म्हणत नाहींत, किंवा त्यांनाही त्याबद्दल ओशाळगत वाटत नाहीं, त्याप्रमाणें जे पदार्थ निःस्वरूप म्हणून निर्भान होतात, अर्थात् मला कळत नाहींत, म्हणून मी त्याविषयीं स्पष्ट तसें बदल्यास स्वयंभानात्मक विद्यमान अशा मला तरी लाजिरवाणें त्यांत काय आहे ? अर्थात्

पदार्थांच्या अभानाचा, अस्फुरणाचा द्योतक असा जर मी आत्मा नित्यप्रकाशरूप आहेंच आहें, तर मग पदार्थ म्हणून पुढें कोणी तोंड काढल्यावर मी त्यास उल्लेखास आणणार नाहीं, त्यावर उजेड करून त्यास मी समजणार नाहीं असें कधींच होणार नाहीं. एरवीं मी आपल्या ठिकाणीं सरसावून सन्मुख नसण्याच्या कल्पनेंत त्यांना शब्दमात्रापुर्ती जागा देऊन त्यांस उल्लेखांत आणीत नसतों असें कांहीं नाहीं; म्हणजे तशा अवस्थेंतही मी त्यांस जाणतोंच, म्हणजे त्यांस स्वप्रकाशानें पुनीत करतों, ही गोष्ट लक्षांत ठेवलीच पाहिजे; सारांश. अज्ञान म्हणून मजकडे दैन्य मानण्यासारखा कांहींच प्रकार नाहीं. पदार्थ असतात तेव्हां मलाच ते कळतात; परंतु पदार्थ म्हणून कोण, काय, कशाचा इत्यादि विचार प्रवृत्त झाला असतां, त्यांचा सर्वथा विचकाच होतो, म्हणजे ते वाचारंभणमात्रस्वरूप इतकेच कायते ठरतात, त्यांच्यांत अर्थरूपता म्हणून कांहीं निष्पन्न होत नाहीं. अर्थात् त्याजविषयीं विचार करूं लागणें म्हणजे त्यांना निःस्वरूप व्हावें लागतें, आणि तो विचार आपल्या मूळ अधिष्ठानभूत तळावर येऊन पोंचतो; तेव्हां पुढें पदार्थ स्फुरेनासे होतात; त्यांचें भान संपतें किंवा नसतें; म्हणजे ते कळावयास उरत नाहींत; याचें नांव ‘ मला ते कळत नाहींत. ’ परंतु मी म्हणजे आत्मा मात्र तेवढा सर्व पदार्थांचा आणि तद्विषयक विचारवृत्तीचा तळ म्हणून स्फुरद्रूपस्वभाव अवशिष्ट असावयाचा तो असतोच. दिवा मालवून पदार्थ दिसेनासे झाले, किंवा कळेनासे झाले, तरी मालविणारा आपल्यास मालवून घेतो असें मात्र नाहीं; म्हणजे त्याचा तो आपल्या स्वतास स्वयंभात असतोच असतो. सरासरी पदार्थांची वाट अशी लागते; ते स्वतः नाहींतच; कारण ते कळण्यांत येत नाहींत. अशा रीतीनें तद्विषयक अज्ञानाला उमसूं देण्यास साक्षी-

भूत स्फुरद्रूपस्वभाव असा मी ह्मणजे आत्मा मात्र आहें हें खास. म्हणजे इतर पदार्थांनीं स्वतः कधींच नसावें, हेंच त्यांचें स्वरूप; आणि असावें असें केवळ एक मींच म्हणजे आत्म्यानेंच, असाच तो आहे. तात्पर्य आत्मा म्हणजे कालत्रयीं अबाधितपणें सर्वत्र समरस असणारा, सत्तामात्रस्वरूप, असेंच त्याचें वर्णन; 'केवळ असणें किंवा अस्तित्वमात्र' हाच आत्मसंज्ञित भावार्थ, असें ह्मटलें आहे कीं,

अस्तीत्येवोपलब्धव्यः ॥ सत्तामात्रं सर्वहृदिस्थम् ॥

म्हणजे शास्त्र तरी आत्म्याविषयीं असेंच खुणवून सांगतें कीं, केवळ असणें अथवा अस्तित्वांश किंवा सन्मात्रअंश हेंच निःसीम सोलीव आत्मसंज्ञित तत्त्व; आत्मा म्हणजे केवळ सन्मात्ररूप. तो कसा समरस ओतप्रोतपणें निष्टंक सिद्ध आहे हें पहा! खरोखर नुसते पदार्थ म्हणजे केवळ वाग्जल्प किंवा बडबड मात्र ते आहेत. हें खरें कीं खोटें हें आतां लवकरच कळून येईल. बुद्धिमात्र सारग्राहिणी पाहिजे. नीट ऐका. आपण व्यवहार करतों तेव्हां असें बोलण्यांत येत असतें कीं, हा घट आहे, हा पट आहे, हें घर आहे, हें देवालय आहे, हीं आकाशादिक तत्त्वें आहेत, हा अमुकाचा पुत्र आहे, इत्यादि अनेक प्रकारचीं वाक्यें आपण उच्चारतों. अशा सर्व वाक्यांत प्रत्येक वेळां 'आहे' हा जो शब्दप्रयोग येतो याचा कधीं तरी आपण तत्त्वतः विचार करतों काय! अर्थात 'आहे' ह्मणजे अस्तित्वांश; आणि घट पट हे पूर्वोक्त न्यायानें जल्प मात्र केवळ. ह्मणजे स्वोत्पत्तीच्या पूर्वीं जसे ते नाहींत, त्याजप्रमाणें स्वनाशानंतरही नाहींत. इतकेंच नाहीं, पण जेव्हां ते आहेत असें ह्मणतों, तेव्हां तरी ह्मणतों इतकेंच. ह्मणजे ह्मणण्या पलीकडे ते कांहीं नाहींत, किंवा शब्द मात्रच तेवढे आपण म्हणतों किंवा उच्चारतों, एरवीं ते कांहींच नाहींत. सारांश, तात्त्विक विचारावस्थेच्या दृष्टीनें पाहतां ते असतांनाच नाहींत; कारण ते

केवल शब्दमात्रस्वरूपच ठरतात. शिवाय घटांत पट नाहीं, पटांत घट नाहीं; तसेंच, जो आतां येथें आहे तो तेथें ह्मणजे दुसरीकडे नाहीं; अशा अनंतप्रकारांनीं पदार्थ ह्मणून शब्दापलीकडे कांहीं हातीं लागत नाहीं. पण ' आहे ' या शब्दप्रयोगानें खुणविलेला अस्तित्वांश, किंवा अस्तित्व, अथवा सद्रूपार्थ म्हणजे सत्तारूपभावार्थ, तो पहा कसा आहे तो! म्हणजे तो मात्र अनुस्यूतपणें अखंड आहे. प्रत्येक वाक्यांत एक अंश **पदार्थ**, आणि दुसरा अंश **भावार्थ**. ह्मणजे एक अंश पदमात्र किंवा शब्दमात्रच, म्हणजे जल्पमात्र असाच तो अर्थ; म्हणजे वस्तुरूप अर्थ कांहींच नाहीं; शब्दमात्रच अर्थ. ह्मणजे शब्दाचा अर्थ, शब्दानें झालेला; शब्दाचा केवळ बनलेला; म्हणजे 'बोलाचीच कढी' आणि 'बोलाचाच भात!' शब्दानें अर्पण केलेला तो अर्थ. सारांश, वास्तवार्थसिद्धि अशी त्यांत कांहींच नाहीं. तथापि दुसरा अंश जो **भावार्थ**, तो नित्य अबाधित अर्थ, तो मात्र वास्तवार्थ किंवा तत्त्वार्थ; कारण तो अखंड शाश्वत अर्थ; तो ओतप्रोतपणें प्रतीत होत आहे. सर्व स्थूल वाग्जल्प सरले किंवा सर्व कल्पनासंज्ञित सूक्ष्म वाग्जल्प सरले, अहंकारबुद्धिवृत्ति मावळली तरी त्यांच्या उद्गमाची किंवा विझून जाण्याची जी कांहीं अवस्था, तिच्या खुणेवरून हा अस्तित्वांश किंवा भावार्थ केवल रूपानें लक्षांत भरण्यासारखाही आहेच. तो अवाच्य आहे; तो वस्तुतः कांहीं शब्दानें केलेला, दिलेला किंवा साधलेला असा अर्थ नाहीं. असा जो अवाच्य अस्तित्वमात्र अंश किंवा वास्तविक भावरूप अर्थ, तोच केवळ आपण ह्मणजे आत्मा. ' आमुची करवेल गोठी, ते झालीच नाहीं वाक्सृष्टि. ' आपण म्हणजे सत्तारूप जो आत्मा तो वस्तुतः न बोलतांच आहे, तो न कल्पितांच आहे; ह्मणून तो अकल्पित सिद्ध आहे. ' आहे ' या संकेतानें खुणविलेली वस्तु निराकार असल्यामुळें ती

ह्मणजे खरोखरच तशी कांहीं आहे, हें साधारण लोकांच्या मनांत भरत नाहीं. तरी त्यास इतकेंच करावें कीं, बाह्यवैखरी, आणि आंतील मध्यमारूप सूक्ष्म ध्वनि न होऊं देतां सावधानपणें असावें, अशा स्थितीच्या धोरणानें ती निराकार सत्ता, अस्तिता, किंवा भावार्थभूत वस्तुस्थिति, आपली ओळख स्वतः अखंड पुरवीत आहे. वाटेल त्यानें परिचय करून घ्यावा. एवंच पदार्थ ह्मणजे वाचारंभणस्वरूप असार संसार; आणि भावार्थ ह्मणजे सारभूत वास्तवरूप असा सन्मात्र आत्मा. संसार ह्मणजे केवळ एकसारखी बडबड, त्यांतील सारें अवसान किंवा दम हा आत्माच आहे; ह्मणजे आत्मसंज्ञित सत्तेच्या जोरावर ही सारी संसार ह्मणून नुसती बडबड आहे. ह्मणजे स्वतः ती सर्वथा अर्थशून्य आहे. शब्द ह्मणून कांहीं ध्वनि होण्यास किंवा होऊन त्याचा पुनः समावेश होण्यास जो अवकाश, जें धाम, जी भूमिका, तीच ही केवळ आत्मसंज्ञित सत्ता. अर्थात् जी निराकार अमूर्त निःशब्दरूप केवळ स्वयंभु सत्ता, ती या प्रत्येक पदार्थाच्या मिषानें आपलाच उल्लेख देत आहे, जणों ती अवतीर्णच होत आहे, आपल्यास अनेक संज्ञांनीं बदवीत आहे. अर्थात् पदार्थाच्या किंवा वस्तुतः केवळ शब्दमात्राच्या उमटाचे अगोदर, शुद्ध, अमूर्त, अनुल्लेख, निराकार, निरंजन असें जिचें अंग उघडें दिसून येतें, तीच आतां शब्दांच्या बुरख्यांनीं, किंवा वेषांनीं तशी तशी समर्याद आपली नांदणूक दाखवीत आहे. 'हा मठ आहे, हा घट आहे, हा पट आहे' इत्यादिक पूर्वींचे शब्दप्रयोग ध्यानांत आणावेत. येथें घट आणि पट इत्यादिक पदार्थ केवळ वाचारंभणमात्रस्वरूप होत. ह्मणजे निवळ अभासच ते, म्हणून मिथ्याभूत, तुच्छ स्वतः अत्यंत निःस्वरूप, असेच ते होत; आणि ' आहे ' ह्मणजे सत्तारूप अंश तेवढा परम सारभूत वास्तविक भावार्थ होय. हा प्रकार दृष्टान्त देऊन

आम्ही स्पष्ट करतों. म्हणजे हा मूळचा कोरा कागदच कां घ्याना. यावर शब्दवाक्यात्मक अक्षरें लिहिलीं आहेत, किंवा अनेक वर्णोल्लेख केले आहेत. अर्थात तो हा शब्दरूप वर्णोल्लेख होण्यास कागद तर अवश्य पाहिजे. तो आपण पुढें धरला म्हणजे त्याजवरच्या शब्द-वाक्यावलीवरच आपली नजर झटकन् जाते, मग तिचाच विचार करूं लागते. पण असें कधीं तरी मनांत येतें काय कीं, हा निर्मल सिद्धरूप कोरा कागद नसता तर ही शब्दवाक्यावलि कशी उमटली असती? अर्थात् तिचा उमट आहे, त्या अर्थीं हा अधिष्ठानभूत कागद अगोदरपासूनच येथें आहे. परंतु कागदाच्या दृष्टीनें त्यावरील सर्व मजकूर बडबड मात्र आहे, विचित्रवर्णमय भासमालच तो आहे. अर्थात् कागदाचे अंगावर ज्याची नजर जाईल त्यास कागद कोराच दिसेल, म्हणजे शुद्धस्वरूपच दिसेल. हा कागद म्हणजे त्यावरील सर्व मजकुराची मूळ अधिष्ठानभूतसत्ता अर्थात् आत्माच. कारण, जर तो हा आधारभूत कागद नाहीं तर वर्णविन्यासाचें नांवही नको. हा दृष्टान्त पूर्ण ध्यानांत आणावा. त्याप्रमाणें दार्ष्टान्तीं हा सर्व संसारसंज्ञित पदार्थसमूह म्हणजे वाचारंभणमात्रच आहे, या पलीकडे त्यांत स्वतांचें कांहीं नाहीं. तो सर्वथा अर्थहीन आहे, उगीच एक आभास आहे. त्यांत स्वताचा पारमार्थिकपणा असा कांहींच नाहीं. तथापि यावरून एक गोष्ट उघड होत आहे; ती ही कीं, वैखरीनें उच्चारले जाणारे, कानानें ऐकले जाणारे, मनानें संकल्पित होणारे किंवा गुणगुणले जाणारे, बुद्धीनें उल्लिखित होणारे किंवा ध्वनित होणारे असे जे वाचक, द्योतक, स्मारक, लक्षक, व्यंजक इत्यादिक शब्दप्रकार हा सर्व चतुर्विध वाचेचा विलास, हें एकंदरं वाचारंभण, याचा अर्थ तो अर्थाभास म्हणजे मिथ्या. परंतु या सर्वांचा उमट होण्याला कांहीं जागा पाहिजे, ती दृष्टान्तांतील कागदाप्रमाणें येथें कोण म्हणाल तर सत्ता-

रूप वास्तविक भावार्थरूप जो मी म्हणजे नामरूपरहित आत्मा, तो. असा आत्मसंज्ञित अधिष्ठानसत्तात्मक मी असल्यांवांचून हा चतुर्विध वाचेचा विलास कसा होणार! वर्णाक्षरांच्या विन्यासास जसा हा कागद, तसा वाचारंभरूप संसारभासास सत्तात्मक आत्मरूप मीच अधिष्ठान. अक्षरविन्यास पुसून जातो, कागद मात्र उरतो; म्हणून कागद तेवढा वास्तविक अधिष्ठान ह्मणून भावार्थरूप आत्माच सत्य; त्याप्रमाणें पदार्थसमूहरूपसंसार वाचारंभणमात्र असल्यानें तो नाहींच होय; कारण वाचारंभणच निर्मूल उपटून टाकल्यास संसार कःपदार्थ आहे. पण सत्तारूप अशा या आत्म्याची गोष्ट तशी नाहीं. कारण सर्व वाचारंभणासह त्या ह्या संसाराच्या प्रविलयासही हा सत्तासंज्ञित आत्मा अधिष्ठान म्हणून अपेक्षित आहे; सारांश, तो आहे तसा असावयाचाच. तेव्हां सर्व अक्षरविन्यासांत अधिष्ठानात्मा हा कागद जशी आपली ओळख अखंड देत आहे, त्याप्रमाणें हा 'घट आहे, हा पट आहे' अशा सर्व वागवलंबी व्यवहारांत 'आहे' ह्मणजे सत्तामात्र अंश तेवढा अबाधित असतो. म्हणून तोच वास्तविक शुद्धभावार्थ. बाकी घटपटादिक सर्व आडंबर बडबडच आहे; स्वार्थशून्य, निःस्वरूप असेच ते पदार्थ ठरतात.

कोणी ह्मणेल 'आहे' ह्मणजे 'सत्ता' असाच जर त्याचा अर्थ आहे तर तो मूळ 'अस्' या धातुपासूनच निघाला आहे. व्याकरणांत इतर जसे अनेक क्रियार्थक धातु आहेत त्याप्रमाणें हाही एक धातु असेल. मग याचीच एवढी काय प्रतिष्ठा आहे? कारण सर्व वाक्यप्रयोगांत 'अस्ति म्हणजे आहे' हाच केवळ एक धातुप्रयोग असतो असे कांहीं नाहीं; अर्थानुरोधानें इतर क्रियार्थक धातुही प्रसंगीं येतात. यावर असें सांगावयाचें आहे कीं, इतर सर्व क्रियार्थक धातु या मूळच्या 'अस' ह्मणजे सत्तार्थक धातूचे पर्याय आहेत. किंवा त्याचे विशेष प्रकार आहेत. जसा गतिसामान्यरूप वायु एकच; पण वर, खालीं, मध्यें, अशा

भिन्न स्थानांतून गतिवशात् तो प्राण, अपान, समान इत्यादि प्रकारचा ठरतो; आणि त्या त्या भिन्न संकेतांनीं वापरला जातो. त्याप्रमाणें सत्ता हाच मूल मुख्य धातु; आणि धातु म्हणजे धारण करणें, अर्थात् आधार किंवा अधिष्ठान होऊन असणें हें तत्त्व मुख्य या प्रकृत सत्तार्थक 'अस्' धातुमध्येंच आहे. अर्थात् इतर क्रियार्थक सर्व धातु हे या 'अस' धातूचेच प्रकार किंवा पर्याय आहेत. क्रियारूप धात्वर्थ असल्यावांचून इतर पदार्थांचा अन्वय होऊन पर्यवसान होत नाहीं; यास्तव धात्वर्थक क्रियापदार्थाचा मान विशेष हें खरें. तरी पण असे सर्व क्रियारूप पदार्थ आणि वाक्यगत इतरही सर्व पदार्थ जेव्हां या आमच्या मूळ अधिष्ठानभूत सत्तासंज्ञित 'अस' धात्वर्थाकडून लब्धस्वरूप आणि लब्धाश्रय होतात, तेव्हांच ते व्यवहारास्पद ठरतात. सारांश, अशा प्रकारचा 'अस' धात्वर्थभूत जो सत्तारूप अर्थ, हाच वास्तविक सर्वांचा धारक अधिष्ठान ह्मणून तोच आमचा आत्मा. तोच मूळ मी, हाच वास्तविक शुद्ध परमार्थ, हाच सर्वांचा अखंड आत्मा ह्मणून परमात्मा; परंतु त्यांतील तरी मुख्य तत्त्वार्थ किंवा भावार्थ सत्तामात्र, सदेकस्वरूप, ह्मणजे केवळ 'असणें' इतकाच अर्थ. 'एक गहू आणि प्रकार बहु' या लोकप्रसिद्ध न्यायानें सत्तारूप आत्मत्वानें घटित असल्यावांचून कोणताही पदार्थ कधींहि व्यावहारिक अस्तित्वास पावत नाहीं. यावरून मूळ निराकार, निःशब्द, अमूर्त अशी जी पारमार्थिक आत्मसंज्ञित सत्ता, तीच ही जगत्संज्ञित विचित्र आणि अनंत पदार्थरूप संस्था किंवा कल्पना आहे. कल्पना म्हणजे आगंतुक बाह्याकार शब्दात्मक विशेष रचना. म्हणजे मूळ निराकार सत्तेच्याच ह्या जगद्रूप अनंत प्रकाराच्या आकृति; अशी कांहीं समजूत घेऊन जर या विश्वसंस्थेंत वागलों तर मूळ मुद्दलास कांहीं कधीं धक्का लागावयाचा नाहीं. अशी समजूत असल्यास ही शब्दकल्पनात्मक विश्वरचना या मूळ निराकार-

सत्तामात्र अशा आत्मीय वस्तुस्थितीस भूषण होणार आहे, नाहींतर दूषणही होणार आहे. कारण वेषरूपी कल्पनात्मक आकृतिकडे पाहत जाण्यानें मूळचे केवळ सन्मात्रस्वभाव अशा स्वस्वरूपाचें आच्छादन होऊन जातें. वेषानें मूळच्या पिंडाची ओळख बुजावी ह्रा अनर्थ आहे. मूळ अंगाची ओळख राहून वेषभाष असेल तर भूषण आहे इतकेंच, असो. ' असणें, असावें ' इतकेंच, ज्याचें वास्तविक तत्त्वस्वरूप तो आत्मा, तोच मी, आणि तोच परमार्थ. तेव्हां इतर सर्व अर्थाचाही अर्थ जो मी, त्या मजकरितां जर हें सर्व पदार्थरूप साहित्य, तर मी दैन्यवाणा काय ह्मणून असावें ! मी आत्मा कांहीं त्या पदार्थसाहित्याकरितां आहे असा प्रकार कधींच कोठें नाहीं. पदार्थींचा भावार्थ, केवळ जीव, प्राण, आत्मा तो मीच परमार्थ. तो मी स्वयंसन्मात्रस्वरूप. पदार्थसाहित्याचा विचार करतां करतां तें शेवटीं शब्दकल्पनामात्र ठरतें. तोही पण कल्पनाशब्दध्वनि विरून जातो, यास सत्तारूप अधिष्ठान साक्षीभूत आहे. अशी ती अधिष्ठानरूप सत्ता मी आहे हें खास. आतां मला मी माझें अंगानें खुलासेवार नजरेंत भरूं लागलों. ' मी कोणी आहें ' असें आजपर्यंत जरी वाटत होतें तरी आतां माझें असणें कांहीं वेगळेंच आहे. येथें ' माझें असणें' असें ह्मटलें ह्मणून मी कोणी एक आणि असणें म्हणून दुसरें असा प्रकार मुळींच नाहीं, माझ्या पदार्थमयतेंत कदाचित् तसें मनांत आणतां आलें असतें, पण आतां तसें सर्वथा संभवतच नाहीं. जो मी म्हणून कोणी, तीच सत्ता; सत्ता तोच मी; म्हणून केवळ सत्ता हेंच माझें तशा लक्षणानें लक्षित होणारें स्वरूप. असें हें माझें सत्तात्मक अंग आतां नेटून सरसावून आसमंतात् परिपूर्णपणें नीट सरसावून ठाण मांडून जागरूक असल्यामुळें कोणत्याच पदार्थध्वनीला उच्छ्वास टाकावयास येथें वावच नाहीं; कारण आतां त्या मद्रूप सत्तेंत शिथिलतांच नाही. अर्थात् पदार्थरूप वाचारंभणमात्र अशा त्या

असारसंसाराची आतां अगदीं सामसूम झाली. आतां मला कोणत्याही नांवानें संबोधूं नका. आतां 'ओ' ह्मणावयास प्रणवस्फूर्ति माझ्या सन्मात्र स्वस्वरूपांत समरस झाली, आणि जी उरली ती अवाच्य, अलक्ष्य अशी सामान्यविशेषभावशून्य केवळ सत्तामात्र स्थिति. हीच मी वस्तुस्थिति.

ही आत्मरूप वस्तुस्थिति जशी 'केवळ सत्ता' या एका संकेतानें शास्त्रोंकडून खुणविली जाते, तशीच ती पुनः ' केवळ चैतन्य, केवल ज्ञप्ति' या संकेतानेंही खुणविली जाते. ह्मणजे ' हा घट दिसतो, हा पट दिसतो, पोट दुखतें, भय वाटतें, भूक लागते, जेवल्यानें समाधान होतें, असे अनेक वाक्यप्रयोग आपण व्यवहारांत बोलतांना करतों. येथेंही पूर्वींच्या विचारसरणीप्रमाणें पाहतां, जरी 'घट, पट दिसतो' असें ह्मटलें तरी ते 'घट, पट,' हे काय आहेत हें कांहीं मला कळत नाहीं, असेंच शेवटीं ठरलें आहे. पण मी मात्र मला आहें असें खास वाटतें, स्फुरतें, जाणवतें; तें कशानें किंवा कोणी दुसरें मला माझेविषयीं जाणवीत आहे तें कांहींच येथें दिसत नाहीं; अर्थात् माझ्या अंगानेंच मला मी जाणवतों, ह्मणजे माझा मीच मला जाणतों, असेंच विचारानें सिद्ध होत आहे. यावरून मी स्वयंज्ञानरूप आहे असेंच ह्मटलें पाहिजे. तथापि इतकें खरें कीं, केवल ज्ञानमात्र अंश तोच 'मी' तत्त्वतः आहें; अर्थात् पूर्वोक्त अभिमानवृत्तिरूप जें अहंतत्त्व, किंवा बुद्धिवृत्तिरूप जें जन्यज्ञानरूप अहंतत्त्व, किंवा ' अहं , किंवा 'मी' म्हणून स्फुरणारें जें शब्दार्थध्वनित असें उल्लेखात्मक ज्ञान, तें कांहीं मी वस्तुतः नव्हे; कारण तें स्वयंभु सत्तारूप केवळ ज्ञानापुढें घटपटादिकपदार्थसदृशच आहे. अर्थात् घटादिकापासून तों अहंस्फुरणापर्यंत हे सर्व भास असज्जडरूप अज्ञानांत बुडतात, त्यावरून अज्ञानांतूनच उगवतात, इतकी गोष्ट उल्लेखास किंवा उजेडांत आणणारें स्वयंस्फुरद्रूप शुद्ध

असंग असें कोणीएक ज्ञानसंज्ञिततत्त्व येथें आहे हें खास; तेंच मी किंवा आत्मा. आतां घटादिक कळत नाहींत असें जरी म्हटलें आहे, तरी तें न कळणें म्हणजे जें अज्ञान, त्याचाही उल्लेख होत असतो, यावरून त्याला साक्षीभूत जें उपपत्तिसिद्धज्ञान, त्यास मात्र नाकबूल करण्याची सोय सर्वथा नाहीं. अर्थात् जें अज्ञानसाक्षिभूत ज्ञान, तेंच मुख्य मी आत्मतत्त्व; बरें अज्ञानोद्भूत जे घटादिक पदार्थ, त्यांस तरी उल्लेखास आणणारें केवल ज्ञानमात्ररूप अशा मजहून दुसरें कोणी ज्ञान म्हणून अधिक तत्त्व आहे, तेंही येथें दिसत नाहीं. सारांश, मद्रूप शुद्ध ज्ञानाच्या दीपानेंच त्यांचा उद्बोध होतो हेंही कोणास नाकबूल करतां येणार नाहीं. बरें, अशी जर वास्तविक स्थिति आहे तर 'अज्ञान' म्हणून हें तरी एक काय मधेंच सोंग आणलें आहे? अहो सोंगच तें! हाही एक कल्पनेच्या परंपरेंत सिद्ध ठरलेला संज्ञामात्र, शब्दमात्र, असा पदार्थ, असा भास, म्हणून हें सोंगच आहे. हें सोंग कोणीं घेतलें? अर्थात् आत्म-संज्ञित स्वयंसत्तारूप स्वयंज्ञानानें. अज्ञानाचें सोंग घेण्यास ज्ञानच पाहिजे. जगांत वेडे पुष्कळ असतात, वेडे होण्यास ज्ञान लागत नाहीं. पण वेड्याचें सोंग घेण्यास मात्र पुरें ज्ञान पाहिजे. वेड्याचें सोंग आणणें फार कठीण आहे. एक पूर्ण ज्ञानीच तसें सोंग आणील, अर्थात् ज्ञानानें आपल्यावर अज्ञान हा शब्दसंकेत रुढविला, दुसरें काय! क्षणभर मौज केली! परमार्थ करणें हाही त्या सोंगांतीलच एक शेवटचा भाग आहे. म्हणजे सोंग टाकून देण्याचा तो भाग आहे, किंवा सोंग उतरण्याचा तो एक समयच आहे. आणि प्रपंच म्हणून जो कांहीं आहे, तो या सोंगाचा ऐन बहर आहे. सोंगाचा साक्षी जसा तो सोंग घेणारा वास्तविक असतो, दुसरा कोणी तितका साक्षी नसतो; त्याप्रमाणें या अज्ञानरूप सोंगास साक्षिभूत शुद्ध बुद्ध पूर्ण असें

सत्ताभूत आत्मसंज्ञित एक केवळ ज्ञानच होय. यावरून सोंग जसें घेणाऱ्याचें अंगांतील जिन्नस नसते, उगीच वरवर तें कांहीं तरी विचित्र असतें, त्याप्रमाणें या केवळ ज्ञानरूप किंवा ज्ञप्तिरूप मुद्दलावर हें अज्ञानरूप सोंग आहे. तें ज्ञानांत न शिरतां वरवर मात्र असल्यासारखें असतें आणि भासतें. ज्ञानाचे अधांत्रीं सान्निध्यावर तें मिरवतें. ज्ञानाचे गर्भीत त्यास प्रवेश नाहीं. अर्थात् ज्ञानवस्तुही पण त्या सोंगांत शिरत नाहीं; तसें होईल तर समजत नाहीं अशा रीतीचा उल्लेख होण्यास या स्वयंभुज्ञानावांचून कोणता दुसरा दीप आहे ? यावरून हें आत्मरूप ज्ञान असंग आहे, तें नित्यनिरंतर स्वप्रभातरूप आहे, आणि अज्ञान ह्मणून उगाच क्षणभर एक कल्पना आहे, तीहि टिकत नाहीं. जेव्हां हें ज्ञान, स्ववृत्तिस्थ अथवा स्वोन्मुख असतें, तेव्हां तर अज्ञान म्हणून कल्पनाही होण्यास दम नाहीं; ह्मणजे तें उरत नाहीं. ज्ञानास स्वताची संमुखता किंवा विमुखता हें तरी काय उगाच बोलणें बोलावें ! अर्थात् ज्ञान ह्मणजे आपण स्वतः आत्मसंज्ञित वस्तुच होय. आपण आपल्यास कधींही विमुख नाहींच; सहजच उजू आणि संमुखच आहों. विचार करकरून शीण मात्र आला, शेवटीं विचारच दमला, इतकेंच नाहीं, त्यानें आपल्यापाशीं गति घेतली. ह्मणजे पदार्थ म्हणून जसा कोणी एक हातीं लागत नाहीं, कारण स्वतः तो कांहीं नाहींच; त्याप्रमाणें अज्ञान हें तरी काय आहे ह्मणून छडा काढण्यास सुरुवात केली तों तेंही कुठें कांहीं शब्दापलीकडे हातीं लागत नाहीं, ह्मणजें सफई तें कांहीं वस्तुच नाहीं. विचारवृत्तीचा जो आश्रय आणि प्रकाश, तो मी मात्र नामनिर्देशावांचूनही प्रकटरूप आहे. मला मीच माझा उरतों; उरतों असें ह्मणणें स्वप्रकाशानें प्रकाशमान आहे ह्मणून, असो. दुसरें कोणी पुढें असावें तर मग इतकें आपल्यास उगाळीत बसावें, तसें दुसरें कोणी अभिज्ञ नाहींच, मग